सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - १५९ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ शुक्रवार दि. १८ जुलै २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## राज्यातील जनता आपल्याला शिव्या देतेय! म्हणतेय, सगळे आमदार माजलेत; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संतापले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

विधिमंडळाच्या आवारात गुरुवारी संध्याकाळी भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली होती. या घटनेमुळे राज्य विधिमंडळाच्या प्रतिमेला बट्टा लागला होता. याबाबत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शुक्रवारी सभागृहात भाष्य केले. यावेळी जितेंद्र आव्हाड यांनी आपल्याला जीवे मारण्याची धमकी आल्याचा मुद्दा उपस्थित केला. मात्र, विधानसभा अध्यक्षांनी मांडलेल्या प्रस्तावाचा आणि आव्हाडांच्या धमकीच्या मुद्द्याचा एकमेकांशी संबंध नाही, असा आक्षेप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नोंदवला. यावर विरोधकांनी खळखळ करताच देवेंद्र फडणवीस हे संतापल्याचे पाहायला मिळाले.

धमकीचा उल्लेख करण्याला कोणाची मनाई नाही. अध्यक्षांनी एखादा प्रस्ताव मांडल्यानंतर कधीतरी आपण राजकारणापलीकडे जाणार आहात की नाही? धमकीचा विषय वेगळा मांडता येईल. कालच्या घटनेने कोणा एका व्यक्तीची प्रतिष्ठा खराब झालेली नाही. इथल्या बसलेल्या प्रत्येकाची प्रतिष्ठा खराब झाली आहे. आज बाहेर ज्या काही शिव्या पडत आहे, त्या एकट्या पडळकर किंवा यांच्या माणसाला पडत नाहीत. आपल्या सगळ्यांच्या नावाने याठिकाणी बोलले जाते, हे सगळे आमदार माजले आहेत. त्यामुळे या गोष्टी गांभीर्याने घ्या. प्रत्येक गोष्टीचं राजकारण करुन आपण महाराष्ट्रातील जनतेला काय सांगणार आहोत. अशाप्रकारे समर्थन करणे योग्य नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.





अध्यक्ष महोदय आपण बोलत असताना असे म्हणालात की, नितीन देशमुख हे माझ्यासोबत आले होते. मी सभागृहात येताना मी रोज एकटा येतो. माझ्यासोबत मी कधीही कोणाला आणत नाही, माझ्यासोबत फक्त माझा पीए चालत असतो. त्याशिवाय माझ्यासोबत कोणीही नसते. मी कधीही कोणाच्या पासवर सही करत नाही किंवा कोणाला पास इश्यू करत नाही. रेकॉर्डवर चुकीचं येऊ नये म्हणून मी हे सांगत आहे. नितीन देशमुख आपल्या ताब्यात आहेत, त्यांना विचारा ते कसे आले होते. मी हे कृत्य करण्यास भाग पाडलं, असा कुठेही महाराष्ट्रात समज होऊ नये. काल ही घटना घडली तेव्हा मी सभागृहात होतो. मी ही घटना घडली तेव्हा मरिनलाईन्सला होतो. या घटनेशी माझा थेट किंवा अप्रत्यक्ष संबंध नाही. ही घटना घडावी म्हणून मी कोणाला चिथावणी दिली का, खुणावलं का, तर तसं मी केलेलं नाही. या लोकशाहीच्या मंदिरात प्रत्येक दगडात लोकशाही जिवंत आहे. ही घटना कशी घडली, हे आम्ही मुख्यमंत्र्यांना सांगितले. त्याच्या जवळपासही मी दिसत नाही. जे झालं ते चुकीचं झालं त्याबद्दल मला वाईट वाटते, असे जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले.

## इस्लामपूर शहराचे नाव बदलणार विधानसभेत सरकारची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

महाराष्ट्र विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असून आज या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते आणि राज्याचे मंत्री छगन भुजबळ (यांनी मोठी घोषणा केली आहे. सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर शहराचे नाव बदलण्यात येणार असल्याची माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी विधानसभेत दिली आहे.



इस्लापूर शहराचे नाव ईश्वरपूर करण्यात येणार असं विधानसभेत बोलताना छगन भुजबळ म्हणाले. यासाठी मंत्रिमंडळांची मान्यता मिळाली असून आता याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे मान्यतेसाठी पाठवणार असल्याचीही माहिती देखील मंत्री छगन भुजबळ यांनी विधानसभेत दिली आहे.

विधानसभेत बोलताना मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, मागील काही दिवसांपासून इस्लामपूरचे नाव बदल्याची मागणी सुरु होती. ४०-५० वर्षांपासून चर्चेत असलेल्या इस्लामपूरचे नाव देखील ईश्वरपूर होण्याची शासनस्तरावरील कार्यवाही अंतिम टप्प्यात होती. आरएसएसचे तत्कालीन इस्लामपूर प्रमुख पंत सबनीस यांनी शहराचे नामकरण ईश्वरपूर करावे अशी मागणी चार-पाच दशकांपूर्वी करण्यात आली होती. तर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची डिसेंबर १९८६ मध्ये इस्लामपूर येथील यल्लमा चौकात जाहीर सभा झाली होती. या सभेत त्यांनी इस्लामपूरचा उल्लेख ईश्वरपूर केला होता. अशी माहिती देखील विधानसभेत बोलताना मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.

## गृहराज्यमंत्री योगेश कदमांच्या आईच्या नावाने मुंबईत डान्सबार

### २२ बारबाला पकडल्या, अनिल परबांचा खळबळजनक आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस आज ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या आई ज्योती कदम यांच्या नावे कांदिवलीतील सावली डान्सबार असल्याचा आरोप त्यांनी केलाय. पोलिसांनी या बारवर धाड टाकून २२ बारबाला ताब्यात घेतल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे.




डान्सबारवर बंदी असतानाही हा बार कसा सुरू आहे? असा सवाल देखील अनिल परब यांनी उपस्थित केलाय.

अंतिम आठवडा प्रस्तावावर अनिल परब यांनी विधानसभेत हा आरोप केला. अनिल परब म्हणाले की, कांदिवली येथे सावली बार आहे. इथे पोलिसांनी धाड टाकली,त्यावेळी २२ बारबाला पकडल्या गेल्या. २२ बारबाला २२ कस्टमर आणि ४ कर्मचाऱ्यांना पकडण्यात आले. या ठिकाणी कस्टमरवर गुन्हा दाखल झाला. या ठिकाणी पोलिसांनी पंचनामा केला. त्या बारचे परमिट हे ज्योती रामदास कदम यांच्या नावे आहे. त्या गृह मंत्र्यांच्या मातोश्री आहेत, असे त्यांनी म्हटले.

एकीकडे लाडक्या बहिणीचा तुम्हाला आशीर्वाद आहे आणि दुसरीकडे तुम्ही आया बहिणीना डान्सबारमध्ये नाचवता? आजच्या आज गृह राज्यमंत्री यांचा राजीनामा घ्यावा. अजित दादा तुम्ही योग्य ती कारवाई कराल. जे मुख्यमंत्री आज कारभार सांभाळतात त्यांनी गृहराज्यमंत्री यांचा राजीनामा घेतला पाहिजे. जर कारवाई झाली नाही तर सरकारचा पाठींबा आहे, हे सिद्ध होईल, असे देखील अनिल परब म्हणाले. सध्या शरमेने मान खाली जातं आहे. आजू बिहारमध्ये म्हणत आहे की, तुमचा महाराष्ट्र बिहार झाला आहे का? गृहराज्यमंत्र्यांकडून कायदे तुडवले जातं असतील तर मुख्यमंत्र्यांच्या कामावर प्रश्न आहे, असा हल्लाबोलही त्यांनी यावेळी केलाय.

## महाराष्ट्रातील गणेशोत्सव राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचवणार, आशिष शेलार यांची घोषणा

**विदर्भ प्रजसत्ताक दि.१८मुंबई**

शंभर वर्षाहून मोठी परंपरा असलेला महाराष्ट्रातील गणेशोत्सवाला राज्य माहेत्सवाचा दर्जा देण्यात आला असून महाराष्ट्रातील गणेशोत्सवात यावर्षी पासून शासन थेट सहभागी होऊन हा महोत्स्व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचवण्यासाठी तसेच राज्यात गणेशोत्सवात होणाऱ्या विविध कार्यक्रमांची रुपरेषा आज सांस्कृतिक कार्यमंत्री ड आशिष शेलार यांनी विधानसभेत जाहीर केली.



विधानसभेत सांस्कृतीक कार्यमंत्री ड आशिष शेलार यांनी जाहीर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र ही कला, संस्कृती व परंपरेची समृद्ध भूमी आहे. संत-सुधारकांचा, थोरांचा-विरांचा,भक्तीचा-अध्यात्माचा आणि सर्वसमावेशकतेचा वारसा या भूमीला लाभलेला आहे.दख्खनची ही पवित्र माती वैचारिक प्रकल्गभतेने ओतप्रेत भारलेली असून, राज्याच्या आर्थिक/ सामाजिक, सांस्कृतिक प्रगतीचा पाया सामाजिक एकरुपतेने घातलेला आहे. ही एकरूपता निर्माण होण्यासाठी गणेशोत्सवाने मोलाची भूमिका पार पडलेली आहे. शेकडो वर्षाची घरगुती गणेशोत्सव परंपरा व अनेक वर्षापासूनची सार्वजनिक गणेशोत्सव परंपरा म्हणजे महाराष्ट्राच्या संस्कृतिक व सामाजिक समरसतेचे मानबिंदूच आहेत.

## विधिमंडळ परिसरात धक्काबुक्की प्रकरणी विधानसभा अध्यक्षांनी निर्णय दिला,दोषींवर होणार कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

भाजपाचे आमदार गोपिचंद पडळकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांमध्ये विधिमंडळाच्या आवारामध्ये झालेल्या धक्काबुक्कीमुळे राज्यातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. ही घटना लोकशाहीचं मंदिर मानलं जाणाऱ्या विधिमंडळाच्या आवारामध्ये घडल्याने या प्रकरणी विधानसभा अध्यक्ष काय निर्णय घेणार याकडे सर्वांच लक्ष लागलं होतं. दरम्यान, आज विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी याबाबत मोठा निर्णय दिला आहे.



विधानसभा अध्यक्षांनी घडलेल्या घटनेसाठी गोपिचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांना खेद व्यक्त करण्याची सूचना दिली. तसेच धक्काबुक्की करणारे जितेंद्र आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख आणि गोपिचंद पडळकर यांचे कार्यकर्ते सर्जेराव टकले यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे, असे नार्वेकर यांनी सांगितले. त्याबरोबरच या दोघांविरोधात विशेषाधिकार भंगाची कारवाई करण्यासाठी हे प्रकरण विधानसभेच्या विशेषाधिकार समितीकडे वर्ग करण्याची घोषणाही राहुल नार्वेकर यांनी केली आहे.

आज सभागृहामध्ये बोलताना राहुल नार्वेकर यांनी गुरुवारी विधिमंडळाच्या आवारात घडलेल्या हाणामारीबाबत सविस्तर माहिती देत दोषींवर करण्यात येणाऱ्या कारवाईबाबत सूतोवाच केले. विधिमंडळाच्या आवारामध्ये, गुरुवारी संध्याकाळी ५.४५ च्या सुमारास दोन अभ्यागतांमध्ये धक्काबुक्की झाली होती. तेव्हा तिथे उपस्थित असलेल्या सुरक्षा रक्षकांनी त्यांना बाजूला केले. दरम्यान, या प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीमधून यामधील नितीन देशमुख याने आपण जितेंद्र आव्हाड यांचा कार्यकर्ता असल्याचे आणि त्यांच्यासोबत विधिमंडळाच्या परिसरात आल्याचे सांगितले. तर सर्जेराव टकले याने आपण गोपिचंद पडळकर यांचा मावस भाऊ असून, त्यांच्यासोबत आल्याची माहिती दिल्याचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितले.तसेच या प्रकरणी या दोन्ही आरोपींसोबत इतर सहा ते सात जणांविरोधात मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहितीही विधानसभा अध्यक्षांनी दिली. या प्रकरणातील दोषींवर फौजदारी कारवाई करण्यात येईल. तसेच दोन्ही आरोपींविरोधात विशेषाधिकार भंगाची कारवाई करण्यासाठी हे प्रकरण विधानसभेच्या विशेषाधिकार समितीकडे वर्ग करण्याची घोषणाही राहुल नार्वेकर यांनी केली आहे.

## पटोलेंनी उल्लेख केलेली व्यक्ती काँग्रेसचीच; हनी ट्रॅपची कुठलीही तक्रार नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीसांचे स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजसत्ताक दि.१८मुंबई**

काँग्रेस नेते नाना पटोले यांनी महाराष्ट्रातले मंत्री, मोठे अधिकारी हे सगळे हनी ट्रॅपमध्ये अडकल्याचा आरोप करुन विधानसभेत मोठा बॉम्ब फोडला होता. नाना पटोलेंच्या आरोपांनी विधानसभेत खळबळ उडाली होती. माझ्याकडे यासंदर्भातील पेन ड्राइव्ह आहे आणि सरकारचं मत असेल तर आम्ही तो दाखवू शकतो असंही नाना पटोले म्हणाले होते. त्यानंतर आता अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हनी ट्रॅपचे कुठलेही प्रकरण समोर आलेलं नसल्याचे म्हटलं आहे. महाराष्ट्र याआधी सुसंस्कृत होता आणि आजही असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मंत्रालय, नाशिक आणि ठाणे हे हनी ट्रॅपचे केंद्र बनले आहेत. या माध्यमातून राज्यातील गोपनीय दस्तऐवज थेट असामाजिक तत्त्वांच्या हाती पोहोचत आहेत, असा आरोप नाना पटोले यांनी गुरुवारी विधानसभेत औचित्याच्या मुद्द्यावर बोलताना केला. यावेळी त्यांनी हनी ट्रॅपचे चित्रीकरण असलेला पेन ड्राइव्ह सभागृहात दाखवला. सरकारने सांगितले तर तो पेनड्राईव्ह दाखवू शकतो असंही नाना पटोले म्हणाले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाना पटोलेंनी उल्लेख केलेली व्यक्ती काँग्रेसचीच असल्याचे म्हटलं.

सभागृहात हनी ट्रॅपची चर्चा सुरु आहे. कोणचा हनी ट्रॅप आणला मला समजतचं नाही. नाना पटोलेंचा बॉम्ब आमच्यापर्यंत आलाच नाही. कुठली घटना घडली तर ती मांडली पाहिजे. यामध्ये आजी माजी मंत्र्यांचा उल्लेख केला जातोय. त्यामुळे आजी माजी मंत्री एकमेकांकडे पाहत आहेत. कुठल्याही आजी माजी मंत्र्याच्या हनी ट्रॅपच्या प्रकरणाची तक्रार नाही. अशी कोणतीही घटना समोर आलेली नाही, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

## जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**

गेल्या काही दिवसांपासून भाजपाचे आमदार गोपिचंद पडळकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यात सुरू असलेल्या आरोप प्रत्यारोप आणि वाकयुद्धाचं पर्यावसान विधिमंडळाच्या आवारातच कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी होण्यामध्ये झालं होतं. या घटनेमुळे राज्यातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. दरम्यान, आता या प्रकरणामध्ये पोलिसांनी आमदार जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. कार्यकर्ते नितीन देशमुख यांना पोलीस ताब्यात घेण्यासाठी आले असताना पोलिसांचं वाहन अडवल्याने जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.



याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार गोपिचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाज यांनी परवा विधिमंडळाच्या आवारात एकमेकांना डिवचलं होतं. त्यावरून तणावाची परिस्थिती निर्माण झाली असतानाच काल जितेंद्र आव्हाड आणि गोपिचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये विधिमंडळ परिसरामध्येच धक्काबुक्की झाली. या धक्काबुक्कीमध्ये सहभागी असलेले जितेंद्र आव्हाडांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना ताब्यात घेण्यासाठी पोलीस आले असताना आव्हाड यांनी पोलिसांच्या कारसमोर झोकून देत अटकेला विरोध केला होता.

जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जितेंद्र आव्हाड हे विद्यमान आमदार असल्याने विधानसभा अध्यक्षांच्या परवानगीने त्यांच्यांविरोधात गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात आली आहे.



## संपादकीय ......

# जनसुरक्षा विधेयक

विधिमंडळाच्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत जनसुरक्षा विधेयक सादर केले. अर्थात हे सुधारित विधेयक सभागृहात येणार याची विरोधकांनाही कल्पना होती. हे विधेयक सादर केल्यानंतर सत्ताधारी व विरोधकांकडून यावर बराच वेळ विधानसभेत चर्चा झाली. महायुतीकडे सभागृहात स्पष्ट बहुमत असल्याने चर्चेनंतर हे विधेयक आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. यानंतर हे विधेयक आता विधान परिषदेत सादर करण्यात येईल.

विधान परिषदेत याला मंजुरी मिळाल्यानंतर ते राज्यपालांच्या स्वाक्षरीसाठी पाठवण्यात येईल. राज्यपालांनी यावर स्वाक्षरी केल्यानंतर त्याचे कायद्यात रूपांतर होईल. महाराष्ट्रातील नक्षलवाद पूर्णपणे संपुष्टात आणण्याचा निर्धार महायुती सरकारने केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीदेखील मार्च २०२६ पर्यंत भारतातून नक्षलवाद संपुष्टात आणणार असल्याची घोषणा केली आहे. केंद्र सरकारकडून तसे प्रयत्नही सुरू झाले आहेत. महाराष्ट्रातही मोदी–शहा यांच्या निर्देशानुसारच वाटचाल करणारे महायुतीचे सरकार सत्तेवर आहे. त्यामुळे अमित शहा यांच्या घोषणापूर्तीसाठी महाराष्ट्र कोठेही कमी पडू नये यासाठीच महायुती सरकारकडून प्रयत्न सुरू झाले आहेत. जनसुरक्षा विधेयक हा त्याचाच एक भाग असल्याचे सांगण्यात येत आहे.

महाराष्ट्रात पूर्वी चार जिल्ह्यांपुरताच माओवादाने प्रभावित झालेल्या नक्षलवादी चळवळीचा उपद्रव दिसत होता. पण मागील काही काळापासून राज्य सरकारने शेजारील राज्यांच्या मदतीने केंद्र सरकारच्या मार्गदर्शनाखाली नक्षलवादविरोधी अभियान सुरू केल्याने महाराष्ट्रात माओवादी चळवळीचा प्रभाव कमी होत चालला आहे. आता राज्यात केवळ दोन जिल्ह्यांमध्ये नक्षलवाद्यांच्या हालचाली व कारवाया सीमित राहिल्या आहेत; परंतु या दोन जिल्ह्यांतूनच नाही, तर राज्यातूनच माओवाद संपुष्टात आणण्यासाठी महायुती सरकारने आक्रमक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

माओवादी संबंधित संघटना वरवर पाहता लोकहिताचा आव आणत लोकशाही वाचविण्यासाठी आपण कार्यरत असल्याचा दावा करत असतात. प्रत्यक्षात त्यांचे कार्य व वाटचाल ही कायदा व सुव्यवस्थेला आवाहन निर्माण करणारी असल्याचे अनेक घटनांमध्ये स्पष्ट झालेले आहे.या संघटना भारतीय संविधानाला व लोकशाहीलाही मानत नसल्याचे उघड झाले आहे. आपली भूमिका राबविण्यासाठी चुकीचा प्रचार करून हिंसेला खतपाणी घालण्याचे कार्य गेल्या काही वर्षांमध्ये या संस्थांकडून करण्यात येत आहे. विधानसभेत सरकारने मांडलेले जनसुरक्षा विधेयक मंजूर झाले असले तरी सरकारने विधेयकात विरोधकांच्या सूचनांचाही आदर करत काही ठिकाणी लवचिक भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. सामाजिक संघटनांनी सुरुवातीपासूनच जनसुरक्षा विधेयकातील कठोर तरतुदींना विरोध दर्शवला होता. या कायद्यानुसारचे सर्व गुन्हे दखलपात्र असून अजामीनपात्र आहेत. संघटनांच्या मालमत्तेचा शासनाने ताबा घेतल्यास संबंधित अधिकाऱ्याच्या विरोधात दिवाणी किंवा फौजदारी दावा करता येणार नाही.संघटनेचा एकही सदस्य बेकायदेशीर कृत्य करत असल्यास तोपर्यंत संघटना अस्तित्वात असल्याचे मानले जाणार आहे. या कायद्याच्या कार्यवाहीस कोणत्याही न्यायालयास मनाई हुकूम देता येणार नाही. तसेच जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय अधिसूचित जागेत प्रवेश केल्यास तो फौजदारी प्रवेश मानला जाणार होता. मात्र, यातील काही तरतुदींमध्ये आता बदल करण्यात आला आहे. जनसुरक्षा विधेयकातील काही कठोर तरतुदींमध्ये बदल करण्यात आला असून, हे विधेयक सौम्य करण्यात आले आहे. मूळ विधेयकात व्यक्ती आणि संघटना यांच्या बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध अशी तरतूद होती, याऐवजी कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटना, असा बदल करण्यात आला आहे. यामुळे सरकारला सरसकट कोणाच्याही विरोधात अटकेची कारवाई करता येणार नाही.

सरकारच्या या भूमिकेचे आता राज्यातील सामाजिक संस्था आणि संघटनांनीदेखील स्वागत केले आहे.जनसुरक्षा विधेयकामुळे माओवादाशी संबंधिताची दुकानदारी बंद होऊन त्यांच्या हालचालींना टाळे लागणार असल्याने विधेयकाबाबत अपप्रचारच जनसामान्यांमध्ये पसरविण्याचे काम संबंधितांकडून सुरू झाले होते. हे विधेयक आल्यावर डाव्या संघटना आणि डाव्या संघटनांशी संबंधित लोकांना अटक केली जाईल, त्यांच्यावर दडपशाही आणि बळाचा वापर केला जाईल, अशी भीती विविध संघटना आणि विरोधकांनी व्यक्त केली होती. तसे समाजव्यवस्थेमध्ये पसरविण्याचे कामही सुरू झाले होते. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी असे काही होणार नसल्याची ग्वाही विधानसभेत दिल्याने विरोधकांच्या अपप्रचारातील हवाच निघून गेली आहे. हा कायदा कुणाला त्रास देण्यासाठी नाही, तर जे लोक आपल्याच देशातील लोकांना ब्रेनवॉश करून चिथावणी देत आहेत. त्यांच्यावर आळा घालण्यासाठी मांडण्यात आला आहे. संसदीय लोकशाहीच्या मार्गाने चालणाऱ्या भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या पक्षांचा आणि त्यातील नेत्यांचा आम्हाला आदरच आहे, असे सांगत फडणवीसांनी विधेयक मांडण्यामागील राज्य सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. फडणवीसांनी सभागृहात या विधेयकाबाबत डाव्यांच्या मनामध्ये असलेले गैरसमज हटविण्याचे काम केले आहे.या कायद्याबद्दल एक गैरसमज आहे की, जर डाव्या संघटनांचे आंदोलन झाले, डाव्या विद्यार्थी संघटनांचे आंदोलन झाले, तर हा कायदा लागू होईल. सर्वांना लोकशाही मार्गाने विरोध करण्याचा अधिकार आहे व जर या आंदोलनावेळी हिंसा झाली, तर अशा वेळी हा कायदा लागू होणार नसल्याचेही त्यांनी राज्य सरकारच्यावतीने स्पष्ट केले आहे. जनसुरक्षा विधेयकामुळे राज्यातील माओवाद कायमचा संपुष्टात येणार असल्याचा दावा केला जात आहे. जनसुरक्षा विधेयकाचे जनसामान्यांकडून स्वागत करण्यात आले असून राज्य सरकारकडूनही विधेयक सर्वसामान्यांच्या सुरक्षेसाठीच असल्याचा दावा केला जात आहे. महाविकास आघाडीकडून या विधेयकाला विरोध करण्याच्या हालचाली सुरू झाल्या असल्या तरी सभागृहातील संख्याबळामुळे विधान परिषदेतही जनसुरक्षा विधेयक मंजूर होण्यास फारसे अडथळे येतील, असे दिसत नाही.

# तुम्ही पण....परफेक्ट वेळेची वाट पाहत आहात का?



तुम्ही तुमच्यात काही बदल करण्यासाठी किंवा एखादं प्रलंबित काम पूर्ण करण्यासाठी परफेक्ट वेळेची वाट पाहत आहात का? नवीन वर्ष, वाढदिवस, शनिवार-रविवार, पुढचा आठवडा, पुढचा महिना अशा कोणत्यातरी खास दिवशी सुरुवात करायचं ठरवत बसता का? आपण अनेक वेळा महत्वाच्या गोष्टी पुढे ढकलतो शेवटच्या दिवशीच बिलं किंवा कर भरतो, नातं संपतं तेव्हा त्याची किंमत समजते, आजारपण आलं कीच आहार बदलतो, व्यसनामुळे शरीर कमजोर झाल्यावरच सोडण्याचा विचार करतो, व्यायाम किंवा ध्यान करतो तेव्हा जेव्हा डॉक्टर सुचवतो...

आपण जितकं पुढे ढकलतो, तितकं आपल्या आयुष्यात येणारी चांगली ऊर्जा रोखतो. कुठून सुरुवात करावी कळत नसेल, तर मार्गदर्शन मागा. आपल्याला शक्य नाही असं वाटत असेल, तर वेळ नाही, आत्मविश्वास नाही, मन नाही अशा कारणांचा नायनाट करा. सुरूवात करण्याचा निर्णय – ही फक्त एक विचाराची गोष्ट आहे. ठरवूया, की आता मनाला शिस्त लावायची आहे. स्वतःला सतत आठवण करून देऊ – मी माझ्या कामांप्रती, माझ्या आनंदासाठी आणि आरोग्यासाठी कटिबद्ध आहे. मी काहीच उशीर करत नाही. मी आता कृती करतो.आपल्या क्षमतेवर मर्यादा आणणारी एक सवय म्हणजे कामं पुन्हा पुन्हा पुढे ढकलणे. चला, थोडा वेळ विचार करूया – किती वेळा आपण स्वतःलाच सांगितलं – असंच थोडं थांबू, उद्या बघतो. आणि मग पुन्हा दुसऱ्या दिवशीही त्याच विचाराला पुढे ढकललं. कधी तो उद्या येतो, तर कधी अजूनही आलेला नाही...आता हेच क्षण घ्या आणि त्या अंतर्गत आळशीपणावर मात करा. विचार कमी आणि कृती जास्त – ही खरी शिस्त अंगीकारा. हळूहळू, तुमचं हे उगाच पुढे ढकलण्याचं वर्तन नाहीसं होत जाईल. जे कामं तुम्हाला आधीच करायची होती, ती करता करता तुम्हाला एक अतुलनीय समाधान मिळेल. तुम्हाला प्रेरणा वाटेल, तुमच्या कल्पना आणि इच्छा प्रत्यक्षात उतरवायची जिद्द निर्माण होईल. तुमच्या आतलं सगळं आळस, भीती आणि अडथळे बाजूला होतील...

**शुभांगी जोशी., ९६०७६७३८५०**




## मधुमेहावर नियंत्रण आणि हृदय सुदृढ ठेवण्यासाठी बाजारात आलंय 'हे' विदेशी फळ



**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

आहारात फळांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यातीलच एक पौष्टिक आणि लोकप्रिय फळ म्हणजे आलू बुखारा. चवदार आणि आरोग्यासाठी लाभदायक असलेले हे फळ सध्या बाजारात चर्चेत आहे.

आलू बुखारा हे फळ जीवनसत्त्व, फायबर, पोटॅशियम आणि अँटिऑक्सिडंट्सचा उत्तम स्रोत आहे. याचे सेवन केल्याने पचनक्रिया सुधारते, रोगप्रतिकारशक्ती वाढते, हृदय आणि डोळ्यांचे आरोग्य राखले जाते. तसेच वजन व मधुमेह नियंत्रणात राहतो.

यामध्ये असलेले पॉलीफेनॉल्स अँटिऑक्सिडंट्स कर्करोगाचा धोका कमी करण्यासही मदत करतात. देशात हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू आणि काश्मीर, पंजाब आणि नागालँड या थंड हवामान असलेल्या राज्यांमध्ये याची लागवड केली जाते.

**आलू बुखारा बाजारात येते कोठून?**– आलू बुखारा हे जगातील अनेक देशांमध्ये पिकवले जाते.

चीन हा जगातील सर्वात मोठा आलू बुखारा उत्पादक देश आहे, जो जागतिक उत्पादनाचा अर्ध्याहून अधिक वाटा उचलतो.

याशिवाय, सर्बिया, रोमानिया, अमेरिका आणि तुर्की हे देखील प्रमुख उत्पादक देश आहेत.

भारतात, थंड हवामान असलेल्या राज्यांमध्ये याची लागवड केली जाते.

उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, पंजाब आणि नागालँड ही भारतातील प्रमुख आलू बुखारा उत्पादक राज्ये आहेत.

त्यामुळे बाजारात दिसणारे आलू बुखारा आपल्या देशातून तसेच चीन किंवा इतर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून आयात केलेले असू शकते.

तथापि, इतर फळांप्रमाणेच आलू बुखाराचे अधिक सेवन केल्यास दुष्परिणाम संभवतात. उदा. पचन बिघडणे, साखर वाढणे, मूत्रपिंडातील खडे निर्माण होणे. त्यामुळे याचे प्रमाणित सेवन करणे आवश्यक आहे.

**बाजारात भाव कसा?**

सध्याच्या काळात, बाजारात आलू बुखाराचा भाव अंदाजे १५० ते २५० रुपये प्रति किलो आहे. हा भाव फळाच्या गुणवत्तेनुसार, आकारानुसार आणि उपलब्धतेनुसार बदलू शकतो. येणाऱ्या सणांमुळे मागणी वाढल्यास दरात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

आलू बुखारा हे फळ अनेक जीवनसत्त्वयुक्त व अँटिऑक्सिडंटने परिपूर्ण आहे. तुमचा रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत करते. त्याच्या सेवनाने अनेक लाभ होतात. आलू बुखाराचे अधिक सेवन केल्यास दुष्परिणाम संभवतात. आहारतज्ञ व वैद्यकीय सल्ला घेऊन फळाचे सेवन करावे.

# शेतकऱ्यांच्या विदेश अभ्यास दौऱ्यासाठी प्रवासी कंपनी निवडण्याकरीता ऑनलाईन टेंडर निघाले

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक**

राज्यातील शेतकऱ्यांना विविध प्रगत देशातील विकसित आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती होण्यासाठी तसेच शेतमालाची निर्यात/कृषी मालाचे पणन व बाजारपेठेतील मागणी याचा अभ्यास करणे.तसेच कृषीमाल प्रक्रिया याबरोबरच त्या देशांमध्ये उपयोगात येत असलेले अद्ययावत तंत्रज्ञान अवगत करून




केलेले शेती तंत्रज्ञान व अनुषंगिक बाबी यांची माहिती त्या देशातील उंचावण्याकरिता कृषी विभागाकडून राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे सन २०२५-२६ ही योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत युरोप, इस्राईल, जपान, चीन, दक्षिण कोरिया व मलेशिया, व्हिएतनाम, फिलीपाईन्स या देशांत शेतकऱ्यांचे अभ्यासदौरे आयोजित करण्याकरिता प्रवासी कंपनीची




**निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दि. २५ जुलै, २०२५ रोजी दु. १२.०० वाजेपर्यंत आहे. GeM² पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आलेल्या देशनिहाय निविदांचे क्रमांक खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | दौरा देश | दौऱ्याचे एकूण दिवस | निविदा क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | युरोप | १२ | GEM/२०२५/इ/६४४३६८५ |
| २ | इस्राईल | ०९ | GEM/२०२५/इ/६४४३७५२ |
| ३ | जपान | १० | GEM/२०२५/इ/६४४३८१९ |
| ४ | मलेशिया, व्हिएतनाम, फिलीपाईन्स | १२ | GEM/२०२५/इ/६४४३३९९ |
| ५ | चीन | ०८ | GEM/२०२५/इ/६४४३४५९ |
| ६ | दक्षिण कोरिया | १० | GEM/२०२५/इ/६४४३५९६ |

त्याचा वापर राज्यातील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतावर/शेतीमध्ये करण्यासाठी सहाय्य करणे.विविध देशांनी विकसित शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा करून समजून घेणे.तसेच क्षेत्रीय भेटी, संबंधित संस्थाना भेटी इत्यादीद्वारे शेतकऱ्यांचे ज्ञान आणि क्षमता निवड करावयाची आहे.

या योजनेंतर्गत ॠशच् पोर्टलवर दि. १४ जुलै, २०२५ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या निविदा प्रक्रियेंतर्गत दि. १८ जुलै, २०२५ रोजी निविदापूर्व सभा राजमाता जिजाऊ समिती सभागृह, कृषी आयुक्तालय, दुसरा मजला, मध्यवर्ती इमारत, पुणे येथे आयोजित करण्यात आली आहे.


शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने
देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०


# भातकुली तालुक्यामधील शाळा, दवाखान्यांची पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि१८अमरावती**

भातकुली तालुक्यातील काही गावांतील शाळा व दवाखान्यांना भेट देत जि. प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी तेथील साधन-सामग्री, मनुष्यबळाचा आढावा घेतला. शाळा व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांशीही त्यांनी संवाद साधला. सीईओ संजीता महापात्र यांनी बुधवारी अचानक काही ठिकाणी भेटी दिल्या. त्यामुळे काही ठिकाणी शिक्षक, डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांच्या उणिवाही स्पष्ट झाल्या. त्या अनुषंगाने सीईओंनी संबंधित विभाग प्रमुखांना योग्य ते निर्देशही दिले. या दौऱ्यात त्यांनी लोणटेक येथील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी केंद्र तसेच रायपूर पांढरी येथील पुनर्वसन परिसरातील शाळा व अंगणवाडी केंद्राची पाहणी केली. नंतर गणोरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिल्यावर भातकुली येथील उर्दू शाळेची देखील सीईओंनी पाहणी केली.

# 'आरोग्य वारी' व्याख्यानमाला आरोग्य भारतीची पालक, विद्यार्थी व प्रौढांसाठी.....एक भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि१८अमरावती**

आरोग्य भारती संघटना, अमरावती महानगर आणि गॅलॅक्सी हॉस्पिटल, आय.एम.ए., विदर्भ युथ वेलफेअर व आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जुलै सोमवार रोजी आरोग्य वारी उपक्रम अंतर्गत आरोग्य व्याख्यानमाला सांस्कृतिक भवनात संध्याकाळी ६.३० ते ८.३० या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. विविध प्रख्यात वक्ते आरोग्य मार्गदर्शन करतील.

स्वस्थ व्यक्ती, स्वस्थ परिवार, स्वस्थ ग्राम आणि स्वस्थ राष्ट्र या ध्येयाने हा आरोग्य उपक्रम आयोजित केला आहे. या व्याख्यानमालेमध्ये मार्गदर्शन करणारे तीनही वक्ते प्रख्यात आहेत. आरोग्य भारती भोपाळचे राष्ट्रीय वक्ते डॉ. अशोक कुमार वाष्र्णेय हे स्वस्थ जीवन शैली एवं स्वास्थ्य क्षेत्र की चुनौतीया या विषयावर मार्गदर्शन करतील ते आयुष मंत्रालयाचे राष्ट्रीय सल्लागार आहेत. दुसरे वक्ते आहेत प्रयास सेवांकुरचे संचालक डॉ. अविनाश सावजी. ते जीवनशैली व आहार तज्ञ म्हणून प्रख्यात असून मेंदूला पोषण देताना, आहार आणि मुलांचा बौद्धिक विकास या विषयावर मार्गदर्शन करतील. अमरावती आयएमएचे उपाध्यक्ष आणि किशोरावस्था तज्ञ व बालरोग तज्ञ डॉ. जयंत पांढरीकर हे सुसंवाद किशोरवयीनांशी या विषयावर मार्गदर्शन करतील. कार्यक्रमाचेसत्कारमूर्ती विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे हे आहेत.स्वस्थ व्यक्ती, स्वस्थ परिवार, स्वस्थ ग्राम आणि स्वस्थ राष्ट्र या ध्येयाने



भारलेल्या अनेक संस्थांनी पुढाकार घेत हा कार्यक्रम आयोजित केला आहे. आनंदी मुले व तणाव मुक्त पालक दोघेही सर्वांगीण विकास आणि सुखी कुटुंबासाठी राहणे आवश्यक आहे. मुले सुखी तर पालक यामुळे मुलांची एकाग्रता, निर्णय क्षमता, आत्मविश्वास, सर्जनशीलता, सुसंवाद दर्शविणारे इंट्युशन प्रोसेस (प्रात्यक्षिक) देखील घेण्यात येणार आहे. या आरोग्य वारीला पालकांनीआणि नागरिकांनी बहुसंख्ये ने उपस्थित राहण्याची विनंती गॅलेक्सी सर्जिकल अँड हॉस्पिटलचे संचालक तसेच आरोग्य भारती अमरावती महानगरचे अध्यक्ष डॉ. आशिष डगवार, उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र नवाथे, सचिव डॉ. अश्विनी सहस्रबुद्धे यांनी केली आहे. सहसचिव डॉ. मंगेश कोल्हटकर, संयोजक डॉ. भार्गव टप्पे व सह संयोजक राजेश कोल्हे, कौशिक जोशी यांचा विशेष सहभाग यात लाभला आहे.आय. एम. ए. अमरावतीच्या अध्यक्षा डॉ. अलका कुथे व सचिव डॉ. राधा सावदेकर यांनी या कार्यक्रमात भाग घेण्याचे आवाहन सर्व जनतेला केले आहे.–


आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. १८ जुलै २०२५

शहर/ग्रामिण



## इतवारा बाजार उड्डाणपूल प्रकरण.....

# सार्वजनिक बांधकाम विभाग प्रधान सचिवांना न्यायालयाने ठोठावला एक लक्ष रु दंड

## ३१ डिसेंबर पर्यंत उड्डाणपुलाचे काम पूर्ण न झाल्यास संबंधितांविरुद्ध अवमाननेचा चालणार खटला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती-**
इतवारा बाजार उड्डाणपुलाच्या रखडलेल्या बांधकामाबाबत अमरावतीचे माजी पालकमंत्री मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेच्या सुनावणीच्या आज दुसऱ्या दिवशी काल न्यायालयाने मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सर्व कागदपत्रांसह न्यायालयात उपस्थित राहण्याचे निर्देश दिले होते. त्याचप्रमाणे प्रधान सचिवांनी न्यायालया समक्ष प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास सांगितले होते. परंतु पावसाळी अधिवेशन सुरू असल्याचे कारण देत प्रधान सचिवांद्वारे न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले नव्हते. त्यांच्या वतीने ज्येष्ठ सरकारी अधिवक्ता श्री.देवेन चव्हाण यांनी उपस्थित राहून प्रधान सचिव अधिवेशनात व्यस्त असल्याकारणाने त्यांनी अतिरिक्त सचिवांना प्रतिज्ञापत्र दाखल करण्याबाबत कळवले असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. यावर न्यायालयाने अत्यंत कठोर भूमिका घेत मग या न्यायालयांमध्ये आम्ही कशाकरिता बसलेलो आहोत असा मौखिक संताप व्यक्त करीत प्रधान सचिव या जनहित याचिकेमध्ये प्रतिवादी असून त्यांना जनहित याचिकेची कॉपी सुद्धा यापूर्वीच दिलेली आहे आणि तशी नोटीस सुद्धा त्यांना बजावलेली होती. असे असतानाही अधिवेशनाचे कारण सांगून प्रतिज्ञापत्र दाखल न केल्याबाबत न्यायालयाने प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना एक लक्ष रुपयाचा दंड ठोठावला असून हा दंड त्यांनी स्वतःच्या पगारातून भरण्याचे निर्देश सुद्धा दिले आहेत.

त्यापूर्वी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती आज न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे न्यायालयात उपस्थित राहून न्यायालयाला फेब्रुवारी २६ पर्यंत या उड्डाणपुलाचे कार्य आम्ही पूर्ण करतो असे नमूद केले. विभागाने आणि कंत्राटदाराने आधीच इतका उशीर करूनही अजून तुम्हाला वेळ हवाच आहे काय?या शब्दात नाराजी व्यक्त करून तीन महिन्यात कोणत्याही परिस्थितीत या उड्डाणपुलाचे कार्य पूर्ण झाले पाहिजे असे स्पष्ट बजावले.

यावर मुख्य अभियंत्यांनी सध्या सुरू असलेला पावसाळा येणाऱ्या काळातील गणपती, दिवाळी, रमजान इत्यादी सण व याच्या पार्श्वभूमीवर पूर्णतः रस्ता बंद करून काम करणे शक्य होणार नसल्याचे न्यायालयाचे निदर्शनास आणून दिले. त्यावर मा. न्यायमूर्ती यांनी त्यांचे म्हणणे अंशतः ग्राह्य धरून जास्तीत जास्त ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी या उड्डाणपुलाचे कार्य पूर्णत्वास गेलेच पाहिजे. अन्यथा कंत्राटदारासह संबंधितांवर माननीय उच्च न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी कारवाई करणार असल्याचे निक्षून सांगितले. हे कार्य पूर्ण करत असताना जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, आयुक्त महानगरपालिका यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला तातडीने सहकार्य करण्याच्या सूचना देखील यावेळी माननीय उच्च न्यायालयाने केल्या आहेत.

तब्बल सात ते आठ वर्षांपासून रखडलेले अमरावती शहरातील पायाभूत सुविधांचे हे अत्यंत महत्त्वपूर्ण काम न्यायालयाच्या दंडुक्यानंतर आता निश्चित मार्गी लागणार आहे. याप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश व ३१ डिसेंबर पूर्वी कोणत्याही परिस्थितीत काम पूर्ण करण्याचा सुस्पष्ट आदेश याबद्दल माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी समाधान व्यक्त करून अमरावती शहराच्या विकासाच्या कोणत्याही कामात आपण यापूर्वीही कटिबद्ध होतो व पुढेही राहू व उपलब्ध आयुधांचा वापर करू असा सार्थ विश्वास व्यक्त करीत मा. उच्च न्यायालयाचे त्यांचे वतीने उच्च न्यायालयात यशस्वी पद्धतीने खिंड लढवली ते एड. शाहू चिखले यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहे.

यापूर्वी तब्बल १४ वर्षांपासून रखडलेले अमरावती विमानतळाचे कार्य सुद्धा डॉ. सुनील देशमुख यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष जनहित याचिकेच्या रेट्यामुळेच मार्गी लागले होते हे विशेष.

### कोर्टाच्या दंडुक्यानंतर मार्गी लागणार!



तब्बल सात ते आठ वर्षांपासून रखडलेले अमरावती शहरातील पायाभूत सुविधांचे हे अत्यंत महत्त्वपूर्ण काम न्यायालयाच्या दंडुक्यानंतर आता निश्चित मार्गी लागणार आहे. याप्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश व ३१ डिसेंबरपूर्वी कोणत्याही परिस्थितीत काम पूर्ण करण्याचा सुस्पष्ट आदेशयाबद्दल समाधान आहे. अमरावती शहराच्या विकासाच्या कोणत्याही कामात आपण यापूर्वीही कटिबद्ध होतो व पुढेही राहू व उपलब्ध आयुधांचा वापर करू. उच्च न्यायालयात यशस्वी पद्धतीने खिंड लढविणाऱ्या ॲड. शाहू चिखले यांचे मनःपूर्वक आभार.

**डॉ. सुनील देशमुख,** माजी पालकमंत्री

---

## विधानभवन राडा प्रकरण :

# यशोमती ठाकूर यांचा संताप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती-** राज्य विधानभवनात आज घडलेल्या गोंधळावर काँग्रेस नेत्या व माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. आज जो प्रकार घडला, तो अतिशय घाणेरडा आणि सभागृहाच्या मानमर्यादेला कालिमा फासणारा होता. एवढ्या वर्षांच्या राजकीय आयुष्यात आम्ही असं दृश्य कधीच पाहिलं नव्हतं, असे त्या म्हणाल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप करत ठाकूर म्हणाल्या, गुंड प्रवृत्तीच्या लोकांना पाठीशी घालण्याचं काम फडणवीस करत आहेत. यावेळी त्यांनी नितेश राणे यांच्या विधानाचा उल्लेख करत, ते स्पष्टपणे म्हणतात की - 'आपला बाप सागर बंगल्यावर आहे, त्यामुळे कोणी काही करू शकत नाही' - हे सभागृहासाठी लाजीरवाणं आहे, अशी टीका केली.गोपीचंद पडळकर यांच्यावर निशाणा साधत त्यांनी म्हटले, या वेडसर माणसांना या सभागृहात आणण्याचे काम भाजपने केले आहे.तसेच ठाकूर यांनी भाजपवर आरोप केला की, हिंदुत्वाच्या नावावर गुंड प्रवृत्तीला वाव दिला जात आहे. महाराष्ट्र हा पुरोगामी विचारांचा राज्य आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी हे समजून घेत या प्रवृत्तीला वळण लावणं गरजेचं आहे, अशी स्पष्ट मागणी त्यांनी केली.या प्रकारामुळे विधानभवनातील वातावरण ढवळून निघाले असून, विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांवर कडाडून टीका केली जात आहे.

---

# हरियाल पक्षी तस्करी प्रकरणात आरोपी मोकाट

## परतवाडा वन विभागाच्या हलगर्जीपणामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१८अचलपूर-** परतवाडा परिसरातील हीरूळपूर्ण गावात दुर्मिळ आणि संरक्षित प्रजातीच्या हरियाल पक्ष्यांच्या तस्करीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणात तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्या ताब्यातून सहा हरियाल पक्षी जप्त करण्यात आले असून, हे पक्षी पिंजऱ्यात बंद करून विक्रीसाठी सज्ज ठेवले जात होते, अशी माहिती समोर आली आहे.

विशेष बाब म्हणजे, या गंभीर प्रकरणात परतवाडा वन विभागाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याने विभागाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. परिणामी स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.पर्यावरणप्रेमी संतप्त, प्रशासनावर अविश्वास

स्थानिक पर्यावरणप्रेमी संघटना व नागरिकांनी वन विभागाच्या निष्क्रियतेवर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, अधिकारी दिनेश वाळके यांची कार्यशैली ही पूर्वीपासूनच वादग्रस्त राहिली असून, त्याच्या कार्यक्षेत्रात वारंवार अशा तस्करीचे प्रकार घडत आहेत. मात्र, कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने दुर्मिळ प्रजातींचे संरक्षण धोक्यात आले आहे.



हरियाल पक्ष्यांची संख्या आधीच कमी होत चालली आहे. अशा तस्करांवर वेळेवर कठोर कारवाई न झाल्यास, भविष्यात ही प्रजाती नामशेष होण्याची शक्यता नाकारता येत नाही.शासन कितीही पर्यावरण संरक्षणाच्या योजना राबवत असले तरी जबाबदार अधिकारी निष्क्रीय राहिल्यास, संरक्षणाच्या प्रयत्नांना यश मिळणे कठीणच, अशी जनतेची भावना आहे.

### पूर्वीही होते आरोपी, तरीही मोकाट!

गुन्हेगार हे तेच असून, यापूर्वीदेखील त्यांनी हरियाल पक्ष्यांची तस्करी केल्याचे उघड झाले आहे. मात्र, त्यावेळी वन विभागाने केवळ औपचारिक कारवाई करून प्रकरण थंडावले होते. आता पुन्हा एकदा त्यांच्याकडून तस्करी होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणाची माहिती काही पशुप्रेमींनी वन अधिकाऱ्यांना दिली होती, मात्र विभागाकडून फक्त मौखिक प्रतिसाद देण्यात आला.

---

# स्कूल बस नियमावली संदर्भात धारणी ठाणेदारांनी घेतला वाहन चालकांचा क्लास



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८धारणी-** शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून पोलीस विभाग धारणी तर्फे गुरुवारी धारणीच्या ऐतिहासिक जिल्हा परिषदेच्या मैदानावर परिवहन नियमालीसंदर्भात स्कूल बस चालकांसाठी एक विशेष मार्गदर्शन सत्र संपन्न झाले. ठाणेदारांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आलेल्या या वर्गात शालेय बस चालकांना वाहतूक नियमावली, गाडीची तांत्रिक तपासणी, ओव्हरलोडिंग टाळणे, योग्य कागदपत्रे बाळगणे आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंबंधी आवश्यक त्या सर्व सूचना देण्यात आल्या.


शाळकरी मुलांच्या वाहतुकीदरम्यान चालकांनी अधिक जबाबदारीने वागण्याचे आवाहन यावेळी नवनियुक्त ठाणेदार अवतारसिह चव्हाण यांच्या वतीने उपस्थित सत्रदरम्यान चालकांपूढे करण्यात आले. असून नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध कठोर, कडक कारवाई करण्याचा इशारा देखील यावेळी ठाणेदारांकडून संबंधित स्कूल बस चालकांना देण्यात आला आहे.या महत्त्वपूर्ण आवश्यक उपक्रमामुळे पालकवर्गात समाधानाची भावना निर्माण झाली असून सुजाण नागरीकांनी ठाणेदारांचे अभिनंदन केले आहे. यापूढे कायदेशीर कारवाई केली जाईल तसेच स्कूल बस चालकांना यापूढे वाहतूक नियमाचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक असून कोवळ्यावयीन बालकांची घरापासून शाळेपर्यंत व शाळेपासून घरापर्यंत होणाऱ्या वाहतूकीत यापूढे कुठलाच हलगर्जीपणा खपवून घेणार नसल्याचे देखील ठाणेदार चव्हाण यांनी स्पष्ट केले. त्यामुळे संबंधित वाहन चालकांना आता शालेय विद्यार्थी वाहतूक परवाना वाहन विमा, वाहन फिटनेस तथा पियुसी प्रमाणपत्र सोबत असने अनिवार्य असून वाहन चालकांना यापूढे गणवेश परिधान करणे देखील अनिवार्य असेल.जर स्कूल बस चालकाने संबंधित नियमावलीचे उल्लंघन केल्यास त्याविरुद्ध सक्त, कठोर कायदेशीर कारवाई होईल असे देखील ठाणेदार चव्हाण यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले आहे. तत्पूर्वी ठाणेदार अवतारसिह चव्हाण यांनी संबंधित वाहन चालकांना परिवहन विभाग तर्फे येणाऱ्या अडीअडची ऐकून त्यावर हवी ती मदत पुरवून योग्य ते सहकार्य करण्याचे देखील यावेळी आश्वस्त करण्यात आले. याप्रसंगी गुप्तहेर प्रमुख कृष्णा जामूनकर, वाहतूक पोलीस अमलदार बुध्दभुषण ऊर्फ बंडू चक्रे, कुंदन नदवंशी, मोहीत आकाशे, जगत तेलगोटे अमलदार पाठक इत्यादींसह मोठ्या संख्येत वाहन चालक उपस्थित होते.

---

# स्वच्छता अभियानात अमरावती मनपा १८ व्या स्थानावर

## केंद्र सरकारच्या वार्षिक स्वच्छता सर्वेक्षणाचे निकाल घोषित

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१८अमरावती** - भारत स्वच्छ मिशन अभियानाचा केंद्र सरकारचा वार्षिक सर्व्हेक्षण अहवाल नुकताच घोषित करण्यात आला आहे. यात अमरावती महापालिका १८ व्या स्थानावर आहे. तर महाराष्ट्र राज्य स्तरावर अमरावतीची रैंक १७ व्या स्थानावर आहे.केंद्र शासनाच्यावतीने संपूर्णदेशात भारत स्वच्छता मिशन राबविले जात आहे. नऊ वर्षापासून राबविण्यात येणाऱ्या या स्वच्छता अभियानात देशभरातील महापालिका व नगरपालिका अशा ४५ हजारांच्या आसपास शहरांनी सहभाग घेतला. शहर स्वच्छतेसह कचरा व्यवस्थापन, कचऱ्याचा निचरासह १० मापदंड आणि ५४ दिशानिर्देशाच्या माध्यमातून



तपासणी करण्यात आली. मागील काही दिवसांपासून महापालिकेच्या विविध भागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शहरातील साफसफाईवर विशेष भरदिला होता.महापालिका अधिकारी, कर्मचारी व लोकसहयोगातून शहरातील साफसफाईवर विशेष भर देण्यात आला. शहर स्वच्छता अभियानाच्या पुरस्काराची घोषणा नवी दिल्ली येथे करण्यात आली. स्वच्छता अभियानाच्या रॅकींगमध्ये इंदोरला प्रथम स्थान प्राप्त झाले आहे.

---

# जय जवान, जय किसान घोषणेसह आ. राणा यांची कर्जमाफीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**
शुक्रवारी विधानभवनात राज्य विधिमंडळाच्या अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना आमदार रवी राणा यांनी जय जवान, जय किसान या घोषणेसह शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य जनतेच्या मागण्या मांडल्या. सभापती ॲड. राहुल नार्वेकर यांच्या माध्यमातून शासनाकडे शेतकरी कर्जमाफीसह अन्य मागण्या सादर केल्या.

आमदार रवी राणा यांनी वैद्यकीय महाविद्यालय आणि रस्ते दुरुस्तीपर्यंत अनेक मुद्दे उपस्थित केले. राज्यातील संकटग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ संपूर्ण कर्जमाफी जाहीर करण्याची मागणी तसेच, बनावट आणि बुडणाऱ्या बी-बियाणे कंपन्यांवर कठोर कारवाई करून त्यांना महाराष्ट्रातून कायमस्वरूपी हद्दपार करण्याची याशिवाय, बोकाळलेल्या वाळू माफियांवर वचक बसवण्यासाठी कडक कारवाईची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

### रस्ते आणि वीज विकासावर भर

मेळघाटातील तसेच संपूर्ण अमरावती जिल्ह्यातील खराब झालेल्या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती आणि वीज वंचित गावांना त्वरित बीज पुरवठा करण्याची मागणी राणा यांनी केली. विशेषतः बडनेरा असेगाव-परतवाडा खंडवा या राष्ट्रीय महामार्गाच्या तातडीने दुरुस्तीवर त्यांनी भर दिला.आषाढी एकादशीला पंढरपूर येथे मुख्यमंत्री पूजा करतात, त्याचप्रमाणे कार्तिकी एकादशीला कौंडण्यपूर येथे रुक्मिणी मातेच्या पूजेसाठी मुख्यमंत्री यांची उपस्थिती असावी आणि हा उत्सव भव्य स्वरूपात साजरा करण्यात यावा, अशी मागणी राणा यांनी केली.कोंडेश्वर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी ३२ एकर जागा आणि १,६०० कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. यासाठी आपण आणि तत्कालीन खासदार नवनीत राणा यांनी मुंबई ते दिल्लीपर्यंत सातत्याने पाठपुरावा केला. ही जागा बदलू नये आणि येथे तातडीने वैद्यकीय महाविद्यालय कार्यान्वित करावे, अशी मागणी त्यांनी केली. धारणी, चिखलदरा आणि अचलपूर येथील जनतेच्या सोयीसाठी नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्याची मागणीही त्यांनी मांडली.



मुंबईतील बंद झालेल्या १२ मिलमधील मराठी कामगारांना घरकुल आणि निवासासाठी जागा मंजूर करण्यात यावी, तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून निर्णय घ्यावा अशी मागणी ही आ.राणा यांनी यावेळी केली.-

# धामणगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिव पदाच्या आदेशास पुढील सुनावणी होईपर्यंत अंतरिम स्थगिती

## राज्याच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातर्फे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८धामणगाव रेल्वे–** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव प्रवीण वानखडे यांच्या सचिव पदाच्या आदेशास राज्याच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातर्फे ३० जूनच्या आदेशान्वये पुढील सुनावणी होईपर्यंत अंतरिम स्थगिती देण्यात आली आहे. यामुळे सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे. आता सचिव पदाचा वाद शासन दरबारी पोहोचला आहे.कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मोहन इंगळे यांनी महाराष्ट्र राज्याचे पणन संचालक पुणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव व प्रविण वानखडे यांच्या विरुद्ध राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या समोर, महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी–विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ५२ब अन्वये अपिल दाखल केली होती.कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मोहन इंगळे यांनी शासनासमोर दाखल अपील अर्जात प्रविण वानखडे, सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती, धामणगाव रेल्वे यांच्यावर आर्थिक बाबींबाबत आरोप असताना व बाजार समितीने दिलेली पदोन्नती ही जम्पींग पदावर नियमानुसार नसताना सुद्धा दिली व याबाबतीत प्रतिवादी क्र. १ तथा पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी जिल्हा उपनिबंधक यांची शिफारस नसताना थेट सादर केलेल्या प्रस्तावास कोणतीही शहानिशा न करता दि.०६.०९.२०२४ रोजीच्या आदेशान्वये मान्यता दिली. पणन संचालक यांचे आदेश रद्द करुन, सदर कर्मचारी यांना पदावनत करण्याबाबत व देण्यात आलेले वेतन व भत्ते वसुल करण्यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ५२(ब) अन्वये माझ्यासमोर अपील सादर केले होते.सदर अपिल अर्जामध्ये कृषि उत्पन्न बाजार समिती, धामणगाव रेल्वे यांनी सन २०१० मध्ये सरळसेवा भरती प्रक्रियेमध्ये कोणतीही परिक्षा न घेता थेट मुलाखती घेऊन ११ कर्मचारी नियुक्त केले व त्याच दिवशी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती यांनी मान्यता सुध्दा दिली. समितीने त्याच दिवशी सर्व नियुक्त कर्मचारी यांना नियुक्ती आदेश देऊन रुजु सुध्दा केले. सदर भरती प्रक्रियेमधूनच प्रविण साहेबराव वानखडे हे बाजार समितीमध्ये लिपिक पदावर रुजु झाले होते. तसेच सदर सरळसेवा भरती प्रक्रिये संबंधात मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका क्र.५१८७/२०१४ (प्रदीप छांगाणी विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) दाखल असल्यामुळे व त्यामध्ये कोणताही निर्णय कार्यवाही झालेली नाही असे नमूद केले आहे.सन २०१७–१८ चे लेखापरीक्षण मध्ये लेखापरिक्षक यांनी विशेष अहवाल व विनिदिष्ट अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती तसेच पणन संचालक, पुणे यांचेकडे सादर केलेला असून सदर अहवालाचे आधारावर खुप मोठ्या प्रमाणात आर्थीक अफरातफर झाल्यामुळे प्रविण वानखडे हे लेखापाल या पदावर असल्याने तसेच सचिव इतर संबधीत कर्मचारी आणि संचालक मंडळावर फौजदारी कार्यवाही झालेली असुन, भारतीय दंड संहिता अंतर्गत केसेस दाखल असून सदर



करिता प्रविण वानखडे यांची जमानत संबंधाने मा. जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती यांचे आदेश स्पष्ट नमुद आहे. यामुळे प्रविण यानखडे यांच्या यांचे विरुध्द खातेनिहाय चौकशी सुरु करण्यात येवुन दोषी सिद्ध झाल्यामुळे त्यांचा प्रभारी सचिवाचा प्रभार काढण्यात आला. तसेच वेतनवाढ सुध्दा रोखण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने वादी यांनी प्रतिवादी क्र. १ तथा पणन संचालक, पुणे यांच्या दि.०६ सप्टेंबर २०२४ रोजीच्या आदेशास स्थगिती मिळण्याबाबत विनंती केली आहे. या प्रकरणी राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे ३० जून २०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस वादी व प्रतिवादी यांच्यावतीने त्यांचे वकील हजर होते. सुनावणी दरम्यान या प्रकरणात यादींकडून विलंब झाला असल्याचे निर्दशनास आणून दिले आहे. याची यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर करुन विलंब क्षमापन करण्याकरिता अर्ज सादर केला आहे. तसेच पणन संचालक तथा प्रतिवादी क्र. ०१ यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केले आहे. प्रतिवादी क्र.०२ व ०३ यांनीदेखील त्यांचे सविस्तर लेखी म्हणणे राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांचेकडे सादर केले आहे.सदर वस्तुस्थिती विचारात घेता धामणगाव रेल्वे येथील बाजार समिती संबंधित अभिलेखे, कागदपत्रे यांची सखोल छाननी करुन त्याठिकाणी देण्यात आलेली पदोन्नती नियमानुसार आहे किंवा कसे ही बाब तपासणे आवश्यक आहे. त्यामुळे वादी यांनी सादर केलेला विलंब क्षमापन अर्ज मान्य करणे आवश्यक आहे. या प्रकरणी वादी यांनी सादर केलेले कागदपत्रे सविस्तर तपासून या प्रकरणी वादी/प्रतिवादी यांची सविस्तर सुनावणी घेवून नैसर्गिक न्याय तत्त्वाचे पालन करुन गुणवत्तेनुसार निर्णय पारित करणे आवश्यक आहे. तसेच या प्रकरणात तात्काळ स्थगिती देऊन त्वरित पुढील सुनावणी आयोजित करुन प्रकरण अंतिम निकाली काढणे आवश्यक आहे. त्यानुसार आदेश पारीत करण्यात आले आहे.


## काँग्रेसचा नवा प्रयोग! भाजपच्या शैलीत बूथ पातळीवर संघटना बांधणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**
संघटन हीच खरी शक्ती, हे उमगलेल्या भाजपने संघटना सर्वोच्च असल्याचे कार्यकर्त्यांत ठसविले. प्रथम संघटना नेता व मग मंत्री, असा मान. त्याचीच फळे ते चाखत असल्याचे म्हटल्या जाते. उलट काँग्रेसीचे वेगळेच. काँग्रेस हा जनतेचा पक्ष. त्यामुळे मूठभर संघटना पदाधिकारी नव्हे तर जनतेस घेऊन आम्ही चालतो, असा गंड घेऊन काँग्रेस वरिष्ठ वाटचाल करीत आल्याचे पक्षाचे नेतेच म्हणतात. पण आता उतरणीचा काळ काँग्रेस नेत्यांना धडे देत आहे. त्याचाच हा दाखला.संघटना निवडणुकीच्या काळात अत्यंत उपयुक्त ठरते म्हणून बूथ लेव्हल, ब्लॉक लेव्हल पदाधिकारी नेमण्याचा भाजपचा शिरस्ता आहे. त्या वाटेवर काँग्रेसने पाऊल टाकले आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी तसे पाऊल टाकले आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत मतदार याद्यामध्ये गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी अनेक ठिकाणाहून प्राप्त झाल्या आहेत. या संदर्भातील अनेक प्रश्नांची उत्तरे अद्यापही निवडणूक कार्यालयाकडून मिळालेली नाही.
मतदार यादीतील गैरप्रकार टाळण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रनिहाय आपल्या पक्षाच्या बूथ लेव्हल एजेंटच्या नियुक्ती कार्यास प्राधान्य देण्यात यावे. प्रदेश उपाध्यक्ष गणेश पाटील यांनी जिल्हाध्यक्ष व अन्य पदाधिकाऱ्यांना पाठविलेल्या पत्रात प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्या सूचनेचा संदर्भ देत हे निर्देश दिलेत.
आगामी काळात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेऊन बीएलए नियुक्तीस प्राधान्य द्यावे. सर्व जिल्हाध्यक्ष तसेच ब्लॉक अध्यक्ष यांनी आपल्या पक्षाचे प्रत्येक मतदान केंद्रावर बीएलए नियुक्त करण्याबाबत दक्षता घ्यावी. त्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याकडे नोंदणीचा अर्ज दाखल करावा. त्याची एकत्रित ब्लॉकनिहाय यादी प्रदेश कार्यालयाच्या संकेतस्थळावर पाठवावी, अशी सूचना प्रदेश काँग्रेस कार्यालयाकडून आलेली आहे.

## ‘त्या’ बार मालकाविरुध्द पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**




फेक वेडिंग पार्टीचे आयोजन करणाऱ्यांसह बार मालकाविरूध्द गुरुवारी पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.सॅम बजाज व त्याच्या चार मित्रांनी शंकरनगर मार्गावरील एरिया ९१ बार रेस्ट्रोमध्ये १२ जुलै रोजी फेक वेडिंग पार्टीचे आयोजन केले होते. तसेच कार्यक्रमाच्या काही दिवसाआधी त्यांनी सोशल मीडियावर जाहिरातसुध्दा केली होती. त्यामुळे १२ जुलै रोजी एरिया ९१ बारमध्ये अल्पवयीन मुला–मुलींसह डिजेच्या कर्णकर्कश्य वाद्यावर दारुच्या नशेत पार्टीला सुरुवात झाली होती. पार्टी रंगात येताच पोलिसांनी धाड टाकली होती. पार्टीमध्ये ८० अल्पवयीन आढळले. यामध्ये ३५ अल्पवयीन मुली आणि ४५ मुलेहोती. ५ ते ६ मुले दारुच्या नशेत आढळले. पोलिसांनी बार मालक आनंद राजू भेले आणि आयोजक सॅम हेमंत बजाज व त्याच्या चार मित्रांविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा (बाल न्याय) मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्याप्रमाणे गुन्हे दाखल केले. पार्टीत सहभागी लहान मुला–मुलींची संख्या पाहता गुरुवारी पोलिसांनी आयोजकांविरुध्द बाल लैंगिक अत्याचार (पोक्सो) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

> बार मालक व आयोजकांविरुध्द पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. तसेच त्यांच्या बारचा परवाना रद्द करण्याकरिता संबंधित विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे.
> – **अरविंद चावरिया,**पोलीस आयुक्त, अमरावती.–



## उदयाला अमरावतीत एकवटणार तीन राज्यातील तेली समाज उद्योजक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**



सामाजिक क्षेत्रात अग्रेसर कैलास छाया चॅरिटेबल ट्रस्ट अमरावतीच्या वतीने येत्या रविवार दिनांक १९ जुलै रोजी अंबानगरी अमरावतीत राज्यस्तरीय तेली समाज उद्योजक मेळावा व समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या उद्योजक मेळाव्याच्या निमित्ताने महाराष्ट्र, मध्यप्रदेश व गोवा या तीन राज्यातील उद्योजक एकवटणार आहे. कैलास छाया चॅरिटेबल ट्रस्ट, यश असोसिएट्स, आसरा रेस्टॉरंट व सावली महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे आयोजित या राज्यस्तरीय मेळाव्याचे उद्घाटन रविवार दिनांक १९ रोजी सकाळी १० वाजता तेली समाजाचे नेते व राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होणार आहे. कैलास छाया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष व तेली समाजातील प्रसिद्ध उद्योजक कैलास गिरोळकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या मेळव्यास महाराष्ट्र प्रांतिक तेली समाजाचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार रामदास तडस, माजी राज्यमंत्री जगदीश गुप्ता हे प्रमुख

### उद्योजक मेळावा व समाजातील गुणवंतांचा होणार सत्कार

अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून तेली समाजातील विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्ती यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहे. राज्यातील तसेच बाहेरील राज्यातील तेली समाजातील उद्योजक एकाच व्यासपीठावर येऊन समाजाला दिशा मिळावी तसेच त्यांच्यात चर्चा होऊन विचारांचे आदान प्रदान व्हावे आणि विविध उद्योगांना वाव मिळावा सोबतच तेली समाजातील गुणवंतांचा यथायोग्य सन्मान होऊन येणाऱ्या पिढी समोर आदर्श निर्माण व्हावा या उदात्त हेतूने या राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगितले. अंबानगरी अमरावतीत प्रथमच आयोजित या अभिनव मेळाव्यास समस्त तेली समाज बांधवांनी व उद्योजकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक मयूर जीरापुरे, छाया कैलास गिरोळकर व तेली समाज हितकारक मंडळाने केले आहे.

## अंबादेवी परिसराची पाहणी ... स्वच्छतेसाठी आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचे सक्त निर्देश

### पार्कींगसाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करण्याचे निर्देश


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती –**
अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज अंबादेवी, एकविरा देवी व हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ या परिसरांची पाहणी केली. परिसरातील वाढत्या गर्दीमुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक आणि स्वच्छतेच्या समस्या लक्षात घेऊन त्यांनी संबंधित विभागांना तातडीने उपाययोजना राबवण्याचे निर्देश दिले.पाहणीदरम्यान आयुक्तांनी पार्किंगची समस्या दूर करण्यासाठी ससनर आणि बांधकाम विभागांना नियोजनबद्ध आराखडा तयार करण्याचे आदेश दिले. अतिक्रमण विभागाला वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच वाहतूक विभागालाही यामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे स्पष्ट केले.या परिसरात दररोज मोठ्या प्रमाणात नागरिक येत असल्याने सर्व समावेशक आराखड्याची आवश्यकता आहे. हा परिसर नियोजनबद्ध पद्धतीने विकसित होण्यासाठी एकत्रित बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.अंबानाला स्वच्छ करण्यात आला असला तरी सध्या मोठ्या प्रमाणात कचरा, निर्माल्य, कपडे व इतर वस्तू नाल्यात टाकल्या जात असल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर नाल्यांची स्वच्छता जे.सी.पी. मशीनद्वारे सुरू असून, नाल्यातील गाळ त्वरित उचलण्याचे आदेशही त्यांनी दिले.पाहणीदरम्यान आयुक्तांनी नागरिकांना आवाहन केले की, नाल्यात कचरा टाकू नये. तसे करताना कोणी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल. अशा प्रकारापासून इतरांनाही परावृत्त करावे.जिथे मोठ्या यंत्रसामग्रीची पोहोच शक्य नाही, अशा ठिकाणी लहान यंत्रसामग्री किंवा मनुष्यबळाच्या सहाय्याने स्वच्छता करावी, तसेच नाल्यांमध्ये पाणी साचू नये यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देशही आयुक्तांनी दिले.या पाहणीदरम्यान वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय जाधव, सहाय्यक आयुक्त भूषण



पुसतकर, बाजार परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त दीपक खडेकार, सहाय्यक नगर रचनाकार कांचन भावे, उपअभियंते प्रमोद इंगोले, लक्ष्मण पावडे, हेमंत महाजन, अतिक्रमण पथकप्रमुख योगेश कोल्हे, जेष्ठ आरोग्य निरीक्षक विजय बुरे, स्वास्थ निरीक्षक धनिराम कलोसे, रोहीत हडाले, प्रितम रामटेके, मनिष हिरोडे, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## अकोल्यात आरोपीकडून पोलिसांची पैशाने ओवाळणी.... आता तेच पोलीस मागावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अकोला–**
‘एम.डी. ड्रग्स’ प्रकरणात खदान पोलिसांनी दोघांना अटक केली. तिसरा आरोपी अद्याप फरार आहे. या प्रकरणातील आरोपी गब्बर जमादारचे शिवसेनेचे माजी मंत्री, माजी आमदार यांच्यासह अनेक राजकीय नेत्यांशी संबंध असल्याचे समोर आले आहे. या नेत्यांसोबतचे त्याचे छायाचित्रही समोर आले आहेत. याशिवाय पोलिसांसोबत देखील त्याचे मधूर संबंध असून पोलीस अधिकाऱ्यांची पैशांनी ओवाळणी करताना आरोपीची चित्रफीत समाज माध्यमातून प्रसारित झाली. दरम्यान, आरोपीला पकडण्यासाठी पोलिसांचे तीन पथके वेगवेगळ्या दिशेने रवाना झाले आहेत.शहरातील गोरक्षण मार्गावर दोन जण अंमली पदार्थ बाळगून असल्याची माहिती खदान पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी घटनास्थळ गाठून त्यांची झडती घेतली. आरोपी मोहम्मद यासीन मोहम्मद आसिफ, मुस्ताक खान हादिक खान यांच्याजवळ अंमली पदार्थ ‘एम.डी. ड्रग्स’ ४६ ग्रॅम ३० मिली ग्रॅम आढळून आले. त्याची किंमत दोन लाख ३० हजार, दोन दुचाकी, भ्रमणध्वनी असा एकूण तीन लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात ताब्यात घेतलेल्या दोन आरोपींसह गब्बर जमादार या तिघांविरोधात खदान पोलीस ठाण्यात कलम ८ (क) २१ (क) एन.डी.पी.एस. क्ट प्रमाणे गुन्हा दाखल केला. फरार आरोपीचा शोध घेतला जात आहे.दरम्यान, या प्रकरणातील आरोपी गब्बर जमादारचे अनेक कारनामे समोर आले आहेत. एका मिरवणुकीत जमादार हा उरळ पोलीस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार गोपाल ढोले आणि पीएसआय कायंदे यांची नोटांची ओवाळणी करताना



चित्रफितीमध्ये दिसून येत आहे. वाढदिवसाचा केक कापतांना गब्बर जबादारच्या कार्यकर्त्याच्या हाती तलवार असलेले छायाचित्रही समोर आले. ड्रग्स प्रकरणातील आरोपी गब्बर जमादार हा वंचित बहुजन आघाडीचा कार्यकर्ता असल्याचे बोलले जात होते. मात्र, पक्षाशी त्याचा कुठलाही संबंध नसल्याचे वंचित आघाडी कडून स्पष्ट करण्यात आले.–

# ब्राम्ही लिपी तयार हस्तलिखिताचे प्रदर्शन स्थळी अतिथींनी दिली भेट

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संस्कृत विभागाचे वतीने आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील संस्कृत विभाग तसेच मालवीय मिशन टीचर ट्रेनिंग सेंटर च्या वतीने नेशनल स्क्रिप्ट वर्कशॉप चे आयोजन करण्यात आले. As per indian knowledge system under pradhan mantri uchchatar shiksha abhiyan ( pm - usha ) अर्थातच भारतीय ज्ञान परंपरा अंतर्गत राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत आयोजित या या कार्यशाळेमध्ये समारोपीय कार्यक्रमाला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या संस्कृत विभागाच्या डॉ. संयोगिता देशमुख यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यशाळेला प्रमुख अतिथी म्हणून नागपूर येथील आशिष जैन, नरसम्मा महाविद्यालय येथील डॉ. डी. एम. रत्नपारखी, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मराठी विभागाचे डॉ. प्रणव कोलते आदी उपस्थित होते.



यावेळी ब्राम्ही लिपी - तयार हस्तलिखिताचे प्रदर्शन स्थळी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू -डॉ. मिलींद बाराहाते, प्र -कुलगुरु - डॉ. महिंद्र ढोरे, कुलसचिव - डॉ. अविनाश असनारे आदिसह अन्य मान्यवरांनी भेटी देऊन ब्राम्ही लिपिची वर्णमाला व अक्षरमालाची माहिती जाणून घेतली. यावेळी विद्यार्थ्यांनी आपला सांस्कृतिक ठेवा व अवगत ज्ञानाचा परिचय करून घेत लिपी शास्त्रामध्ये उपलब्ध असलेल्या संशोधन व रोजगार संधीची माहिती जाणून घेतली. इसविसन पूर्व सुमारे तीनशे वर्षांपूर्वी ब्राम्ही लिपिची उत्पत्ती झाली. ब्राम्ही लिपी ही सर्वात प्रथम लिपी आहे. ब्राम्ही लिपी नंतर अनेक लिपी निदर्शनास आल्या. ब्राम्ही लिपी मध्ये आपल्याला अशोकाच्या काळातील अनेक शिलालेख आढळून येतात. ज्यामुळे अशोकाच्या इतिहासकालीन बहुमूल्य आठवणींना जणुकाही उजाळाच मिळत असल्याची अनुभूती प्राप्त होतेय. कालमानपरत्वे ब्राम्ही लिपीचा विकास होत गेला. जसे की, गुप्तकालीन ब्राम्ही, शुन्गकालीन ब्राम्ही, कुशानकालीन ब्राम्ही अशा प्रकारे ब्राम्ही लिपीतून इतरही लिपिंचा विकास होत गेला. त्यातूनच अभ्यासाला व अध्ययन कार्याला प्रारंभ झालाय. उदाहरणं द्यायचे झाल्यास ब्राम्ही देवनागरी, खरोष्टी, शारदा सिद्ध मातृका, सिंधू, बंगाली, तामिळ इत्यादी लिपी विकसित होत गेल्या. लिपी विस्तार ग्रंथात्म मध्ये ६४ लिपिंचा उल्लेख आढळतो. त्यापैकी ब्राम्ही लिपी सर्वात प्रथम लिपी आहे. त्यामध्ये ब्राम्ही लिपीला धम्म लिपी असेही संबोधल्या जातेय. यासोबतच काही जैन ग्रंथामध्येंही सुद्धा ब्राम्ही लिपीचा उल्लेख दिसून येतोय. अशा प्रकारचे विविध दाखले, उदाहरणे व तत्कालीन संदर्भ देत प्रमुख अतिथींनी यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले.स्पर्धात्मक व धावपळीचे युग असताना सुद्धा आपल्या भारतीय संस्कृतीशी नाळ जुळवून घेत विविध भाषा व परंपरेने नटलेल्या तसेच ब्राम्हीलिपीचे तत्कालीन व आजसुद्धा ब्राम्ही लिपीचे अधोरेखित होत असलेले महत्व लक्षात घेत, उपस्थित विद्यार्थिनींनी एकाग्रता व शिस्तबद्धतेचा परिचय करून देताना आमची संस्कृती - आमचा संकल्प अन ब्राम्हीलिपी याचाच प्रत्यय यावेळी आणून दिल्याचे दृश्य यावेळी दिसून आले.यावेळी नेशनल स्क्रिप्ट वर्कशॉप तसेच तयार हस्त लिखिताचे प्रदर्शन प्रसंगी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संस्कृत विभागाच्या समन्व्यक - डॉ. संयोगिता देशमुख, डॉ. राहुल लोढा, सपना यावले, श्वेता बडगुजर, आदिसह विद्यार्थी - विद्यार्थिनी, पालक, आमंत्रित सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते. या नेशनल स्क्रिप्ट वर्कशॉप चे आयोजन व समारोपीय कार्यक्रम संदर्भात संस्कृत विभाग समन्वयक - डॉ. संयोगिता देशमुख यांनी दिली.

# मयत व निवृत्त झालेली व्यक्ती अजूनही नगरपालेकेच्या आस्थापनेवर

## माहिती अधिकारात अंजनगाव सुर्जी नगरपालिकेचा कारभार चव्हाट्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अंजनगाव सुर्जी**

आपल्या वादग्रस्त कार्यालयीन शैलीने नेहमी प्रकाशझोतात राहणाऱ्या अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेवर आता नवीनच प्रकरण उघडीक आले आहे. १९ जूनरोजी दाखल केलेल्या माहिती अधिकारात नगरपरीषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने चक्क मय्यत व निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना आस्थापनेवर दाखवत अंजनगाव सुर्जी नगरपालीकेच्या भ्रष्ट प्रशासनाची पावती स्वहस्ते स्वःतः पालिका प्रशासनाने दिल्याने नगरपरिषदेच्या नवीन वादास तोंड फुटले आहे.शासनाच्या नगरविकास विभागाच्या वतीने नगरपरिषद शहरासाठी अनेक कर्तव्ये पार पाडली जाते. मुख्यत्वे, शहराच्या मूलभूत गरजा, जसे की स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते आणि सार्वजनिक प्रकाश व्यवस्था, यांचे व्यवस्थापन करणे हे नगरपरिषदेचे कर्तव्य



> माहिती मी दिली नसून लिपीक सोळंके यांनी दिली. त्या दिवशी माझी प्रकृती खराब होती. चुका असतील तर मी त्या दुरुस्त करुण देण्यास तयार आहे.
>
> **सुनील उमक,**
> **जनमाहीती अधिकारी**
> **न. प. अंजनगाव सुर्जी.**

असुन याव्यतिरिक्त, आरोग्य सेवा, शिक्षण आणि विकास योजनांची अंमलबजावणी करणे देखील नगरपरिषदेची जबाबदारी आहेत. हा सर्व कारभार शासनाने नेमलेल्या अधिकारी, कर्मचारी करतात. त्यांची संख्या, पदे, कामे याची माहिती त्या कार्यालयात नोद केलेली असते. त्याच माहिती माध्यमातून अधिकारात नगरपरिषदेचा आकृतीबंध, आज रोजी कार्यरत आस्थापनेवर अधिकारी, कर्मचाऱ्यांची माहिती, अस्थायी कर्मचारी माहिती, अतिरिक्त प्रभार असलेल्या कर्मचाऱ्यांचे माहितीसह इतरची मागणी माहिती अधिकारात केली होती. मात्र कार्यलयीन कामाशी आस्था नसणाऱ्या जनमाहिती व प्रशासनिक अधिकाऱ्याने चक्क मार्च २०२५ मध्ये मय्यत झालेला कर्मचारी, मार्च महिण्यातच निवृत्त झालेला शहर अभियंता, एप्रिल मध्ये बदली झालेला अंतर्गत लेखापरीक्षक, तरनगर संचानलयाचे अधिकार वापरत लिपिक शिपायाला आस्थापनेवर दाखविले. सदर माहितीमध्ये मयत व निवृत्त झालेल्या व्यक्तीचे वेतनसुद्धा दाखवण्यात आले आहे. विशेष म्हणजे ही माहिती १६ जुलैला पुरवल्याने आणि या व्यक्ती अजुनही आस्थापनेवर असल्याने यांचे आजपर्यंतचे वेतन तर प्रशासनाने काढले नाही ना? असा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे.

# नांदगाव केंद्रावरील २ कोटी ४१ लक्ष रुपयाचे ज्वारी खरेदीचे चुकारे रखडले; शेतकरी आर्थिक अडचणीत



> हमीभावाने खरेदी केलेल्या ज्वारीची प्रोसेस पूर्ण करून शासनाकडे पाठविण्यात आली; परंतु अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात मध्ये खरेदी केलेल्या ज्वारीची रक्कम शासनाकडून अद्यापही जमा करण्यात आली नाही. सरासरी एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होत आहे.
>
> **परीक्षित ढेकेकर पाटील,अध्यक्ष खरेदी विक्री संस्था नांदगाव खंडेश्वर**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नांदगाव खंडेश्वर**

खरेदी विक्री संस्थेमार्फत राज्य शासनाकडून नांदगाव खंडेश्वर केंद्रावर हमीभावाने शेतकऱ्याकडून खरेदी करण्यात आलेल्या ज्वारीचे चुकारे रखडले असून एकूण १४२ शेतकऱ्यांचे २ कोटी ४१ लक्ष २६५० रुपयाचे रक्कम रखडली असल्याची माहिती खरेदी विक्री संस्थेकडून मिळाली. अंदाजे एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊनही ज्वारी विक्रीची रक्कम शासना कडून मिळाली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होत आहे.तालुक्यात यावर्षी उन्हाळ्यात ज्वारी पिकाचा पेरा असून शासनाचा हमीभाव ३३७१ प्रतिक्विंटल असल्यामुळे शेतकऱ्यांनी योजनेमध्ये ज्वारी विक्री करण्यास प्रतिसाद दिला. नांदगाव खरेदी विक्री संस्थेकडे ऑनलाइन नोंदणीझालेल्या १४२ शेतकऱ्यांची ७१५० क्विंटल ज्वारी या केंद्रावर हमीभाव अंतर्गत खरेदी करण्यात आली. सरासरी एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन सुद्धा अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्यावर ज्वारीची रक्कम जमा झाली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा खिसाअद्यापही रिकामाच आहे. सध्या खरिपाचा हंगाम सुरू असल्याने शेतकऱ्याला शेती करिता पैशाची नितांत गरज आहे. तेव्हा खरेदी केलेल्या ज्वारीचे चुकारे तात्काळ करण्यात यावे अशी शेतकऱ्याकडून मागणी होत आहे.या केंद्रावर अद्यापही नोंदणी केलेले ५३ शेतकरी ज्वारी मोजणीच्या प्रतीक्षेत आहे.

# श्री क्षेत्र रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाला शासनाने दिला ४.२५ कोटी रुपये निधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८रिद्धपुर (मोर्शी)**

शासनाने मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूरची स्थापना १९/०१/२०२४ रोजी करण्यात आली. त्यानुसार विद्यापीठाचे प्रथमकुलगुरू म्हणून डॉ. अविनाश अवलगावकर यांची नियुक्ती होऊन त्यांनी ०५ सप्टेंबर २०२४ रोजी पदभार स्वीकारला. त्यानंतर वर्षभरात व्यवस्थापन मंडळ, विद्या परिषद, महामंडळे इत्यादीच्या वेळोवेळी बैठका होऊन पदवी व पदव्युत्तर




अभ्यासक्रम निश्चित करण्यात आले.त्यानुसार प्रथम वर्षांकरिता प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे. याकरिता शासनाकडून ११ सप्टेंबर २०२४ रोजी रुपये ४.२५ कोटी रुपये तात्पुरत्या स्वरूपात प्रशासकीय इमारत, सभागृह, वर्गखोल्या व वसतिगृह तयार करण्याकरिता प्राप्त झालेत. त्यानुसार मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर येथे नवीन इमारतीमध्ये ०२ जुलै २०२५ रोजी कामकाज सुरू झालेले आहे. तसेच विद्यापीठाच्या दैनंदिन खर्चा करिता रुपये३.२४ कोटी मंजूर झालेले आहे.आजपर्यंत शासनाने एवढा निधीरिद्धपूरच्या मराठी विद्यापीठाला देण्यात आल्यावरही अमरावती येथील राजकमल चौक येथे मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूरला स्थापनेपासून ते आजपर्यंत खर्चाकरिता एक ही रुपया अनुदान दिले नाही, या आशयाचे फलक लावण्यात आले आहे. हे चुकीचे असून हा जाणीवपूर्वक खोडसाळपणा आहे. शासनाने आतापर्यंत ४.२५ कोटी निधी दिला असून दैनंदिन खर्चाकरिता ३.२४ कोटी मंजूर आहे, असे रिद्धपूर मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश अवलगावकर यांनी सागितले.

# जिल्ह्यातील पोस्ट ऑफिसमध्ये २१ जुलैला व्यवहार राहणार बंद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

भारतीय डाक विभागाने सेवांमध्ये मोठे बदल घडवून आणण्यासाठी आयटी २० या उपक्रमांतर्गत 'एपीटी ॲप्लिकेशन' ही नवीन डिजिटल प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला. यामुळे पोस्ट ऑफिसमधील व्यवहार जलद, अचूक, ग्राहकाभिमुख होणार आहेत. या नव्या प्रणालीची अंमलबजावणी प्रमुख पोस्ट ऑफिसमधून सुरू होणार असून, २२ जुलैपासून प्रधान डाकघरांच्या अखत्यारितील अमरावती, भातकुली, नांदगाव खंडेश्वर, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे, तिवसा, मोर्शी, वरुड तालुक्यातील टपाल शाखा डाकघर कार्यालये व उपडाकघर कार्यालयांत ही प्रणाली कार्यान्वित होईल.या तांत्रिक कामाने,, सोमवार २१ जुलैला तालुक्यारील पोस्ट ऑफिसमध्ये व्यवहार केले जाणार नाहीत, अशी माहिती पोस्ट विभागांचे प्रवर अधीक्षक (डाकघर) यांनी दिली आहे.

# आर्टिफिशियल इंटेलिजन्स, आयटी पार्कसह महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना चालना

## खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्याकडून मॅरेथॉन आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

विकसित भारताची पायाभरणी करताना तरुण नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी तंत्रज्ञान आधारित प्रकल्पांचा अमरावतीतील तरुणांना लाभ व्हावा आणि जिल्ह्यात त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी गुरुवारी (ता. १७) जिल्हाधिकारी कार्यालयात मॅरेथॉन बैठक घेतली.डॉ. बोंडे यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीत त्यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स, माहिती तंत्रज्ञान (आयटी) पार्क, सायन्स सिटी यासह विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांच्या गतीने अमलबजावणीसाठी स्पष्ट सूचना दिल्या. या बैठकीला जिल्हाधिकारी आशिष येरेकर, उद्योग विभागाचे



महाव्यवस्थापक महेश निकम, बंगळुरू येथील आयटी हब स्थापनेत महत्त्वाची भूमिका बजावणारे संतोष महालिंगम, महसूर कालिंगण, जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष अविनाश कोठाळे, गौरव दळवी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक राम लंके, महावितरणचे अधीक्षक अभियंता दीपक देवहाते, एमआयडीसीच्या शुभांगी पिंपरीकर, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य विजय अंभोरे, अविनाश वाकोडे यांच्यासह उद्योग, कामगार, ऊर्जा, बीएसएनएल, महसूल, वन, पर्यावरण, पर्यटन संचालनालय यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत अमरावती जिल्ह्यातील तरुण उद्योजकांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. यामध्ये स्टार्टअप फोरमची स्थापना, आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या माध्यमातून व्यावसायिक गतिमानता आणणे, आयटी पार्कची उभारणी, सायन्स सिटी निर्मितीसाठी प्रशासकीय प्रक्रिया गतिमान करणे यासारख्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. या प्रकल्पांमुळे अमरावतीच्या विकासात क्रांतिकारी बदल घडतील, असा विश्वास डॉ. बोंडे यांनी व्यक्त केला. यामुळे पुणे, मुंबई, बंगळुरू येथे रोजगारासाठी जाणार्या तरुणांना स्थानिक पातळीवरच मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल.

त्यासाठी प्रशासनाने प्रकल्पांना गांभीर्याने घेऊन वेळेत अंमलबजावणी करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. याशिवाय, नांदगावपेठ येथे नमो जवान नमो किसान निसर्ग पर्यटन केंद्राची निर्मिती, खारपाणपट्टयातील पानंदरस्ता, दर्यापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याची स्थापना यासारख्या विषयांचाही आढावा घेण्यात आला.



# आ.रवि राणा यांच्या विशेष प्रयत्नाने दस्तुर नगर ते कोंडेश्वर पर्यंतच्या हायटेंशन ओव्हररेड टॉवर लाईनला काढण्यास सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

गेल्या अनेक वर्षांपासुन दस्तुर नगर परिसरापासुन ते कोंडेश्वर फीटर पर्यंत हायटेंशन टॉवर लाईनची विद्युतवाहिनी नागरिकांच्या दुकान, घर तसेच सार्वजनिक बगिचावरुन गेलेली होती. हायटेंशन विद्युत तार आणि टॉवरमुळे नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता. तसेच हायटेंशन विद्युत तारांमुळे नागरिकांना बांधकामाकरिता तसेच त्या रस्त्यावरुन जात असलेल्या वाहतुकीला सुद्धा खोळंबा निर्माण होत होता. तसेच १० ते १५ किलोमीटरपर्यंत पसरलेल्या हायटेंशन तारामुळे शेकडो मकान आणि दुकान तसेच परिसरातील बगिचांना सुद्धा समस्या निर्माण होत होत्या. या तारांमुळे अनेकदा वाहनांचे अपघात होवून नागरिकांना गंभीर दुखापती सुद्धा झाल्या होत्या. त्या परिसरातील नितीन बोरेकर तसेच महेश मुलचंदानी यांच्या पुढाकाराने जेव्हा नागरिकांनी आ.रवि राणा यांच्या कडे याबाबत तक्रार केली असता आ.रवि राणा यांनी तातडीने याची दखल घेवून विद्युत विभागाच्या मुख्य अधिकार्यांना धारेवर धरुन नागरिकांच्या जीवाशी न खेळता लवकरात लवकर या ठिकाणावरच्या सर्व हायटेंशन ओव्हररेडच्या सर्व टॉवरलाइनच्या विद्युततारा काढण्याबाबत आदेश दिले व त्यानुसार विद्युत विभाग जागा होवून दस्तुर नगर ते कोंडेश्वर पर्यंतच्या हायटेंशन टॉवरलाईनच्या विद्युततारा काढण्यास सुरुवात झाली. त्यामुळे आ.रवि राणा यांनी गेल्या अनेक वर्षापासुनचा रेंगाळलेला प्रश्न निकाली काढुन नागरिकांना दिलासा दिल्यामुळे आता नागरिकांना घराच्या बांधकामासाठी तसेच इतर बांधकामासाठी कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होत नसल्याने दिलासा मिळाला आहे. यावेळी नितीन बोरेकर, महेश मुलचंदानी, तसेच नागरिक उपस्थित होते.

# मैत्रीच्या वादातून युवकाची निर्घृण हत्या; दोघांना हैद्राबादहून अटक


**विदर्भ प्रजासत्ताक दि. १८ वरुड**

बनोडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आष्टी-राजुरा बाजार रस्त्यालगत वर्घाळ गावाजवळील नाल्यात १६ जुलै रोजी एका अनोळखी युवकाचा मृतदेह आढळून आला होता. मृताची ओळख राहुल अशोकराव तायडे (वय ३९, रा. आयमा नगर, आष्टी) अशी पटली आहे. या खून प्रकरणातील गौरव उर्फ सौरव परतेती (रा. झटामझिरी) व गोपाल महादेवराव कुमरे (रा. आष्टी) या दोघा आरोपींना हैद्राबाद येथून अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे.

राहुल तायडे ११ जुलैपासून बेपत्ता होता. कुटुंबीयांनी १२ जुलै रोजी आष्टी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर १६ जुलै रोजी नाल्यात मृतदेह सापडल्याने घातपाताचा संशय बळावला. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे तपासाची चक्रे फिरवत आरोपींचा ठावठिकाणा शोधून त्यांना हैद्राबाद येथून ताब्यात घेतले.चौकशीत आरोपींनी कबूल केले की, राहुलसोबत दारू पित असताना झालेल्या वादातून त्यांनी त्याला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली, नंतर नाल्यात ढकलून चिखलात डोके दाबून त्याचा खून केला. खून केल्यानंतर ते राहुलची मोटारसायकल व मोबाईल घेऊन फरार झाले होते.या प्रकरणी बनोडा पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधान कलम १०३(१), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास ठाणेदार विवेक देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# अमरावती शहरात बिबट्याचा कहर

## तपोवन परिसरात बिबट्या घुसला घरात ; पाळीव कुत्र्याला उचलून जंगलात घेऊन गेला : नागरिकांत भीतीचं वातावरण





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि १८ अमरावती**

शहरातील तपोवन परिसरात मंगळवारी रात्री बिबट घुसल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मध्यरात्रीनंतर सुमारे १२.३० वाजता तेंदुआ एका घरात घुसून तिथल्या पाळीव कुत्र्यावर झडप घालत त्याला उचलून घेऊन गेला. या घटनेमुळे परिसरात दहशतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, तेंदुआ घराच्या भिंतीवरून उडी मारून थेट आंगणात घुसला. कुत्र्याला आक्रमकपणे पकडून काही क्षणातच तो जंगलाच्या दिशेने पसार झाला. घरातील सदस्य काही समजण्यापूर्वीच ही घटना घडली.

या घटनेनंतर संपूर्ण कॉलनीत घबराट पसरली असून नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. विशेष म्हणजे, याआधीही या भागात तेंदुआ फिरत असल्याच्या घटना घडल्या आहेत.

वन विभागाकडे तीव्र मागणीस्थानीय रहिवाशांनी वन विभागाकडे तातडीने पिंजरा लावण्याची, तसेच गस्त वाढवण्याची मागणी केली आहे. तेंदुआ मोकाट असल्याने नागरिकांचे सुरक्षितता धोक्यात आली असून वन विभागाने त्वरित कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

या परिसरातील नागरिकांनी दोन दिवस आधीच तपोवन संस्थेमार्फत वनविभागाकडे लेखी तक्रार दिली होती.तपोवन संस्थेमध्ये अबाल वृद्ध राहतात. त्यासोबतच आदिवासी विद्यार्थी,रुग्ण या ठिकाणी मोठ्या प्रमाणात उपचारासाठी येतात.वनविभागाचया अधिकाऱ्यांनी या ठिकाणाची पाहणी करीत या ठिकाणी दोन ट्रॅप कॅमेरे लावले आहेत. मात्र अजून पर्यंत हा बिबट वनविभागाच्या हाती लागलेला नाही. त्या मुळे या परिसरात भीतीचे वातावरण आहे.

# सेवानिवृत्त सैनिकांकडून मिल्ट्री कॅन्टीन मधील विदेशी मद्याची अवैध वाहतूक

## वेलकम पॉईंटजवळ एक्साईज च्या भरारी पथकाची मोठी कारवाई : ९.९३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

भारतीय सैन्यातुन सेवानिवृत्त झालेल्या दोन माजी सैनिकांकडून मिल्ट्री कँटीन मधील विदेशी मद्याची अवैध वाहतूक करत असतांना राज्य उत्पादन शुल्कच्या भरारी पथकाने वेलकम पॉईंटजवळ सापळा रचून ९.९३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.१६ जुलैच्या सायंकाळी ही कारवाई करण्यात आली. सेवानिवृत्त झालेल्या अनेक माजी सैनिकांच्या नावावर नागपूर येथील कँटीन मधून मद्याच्या बाटल्या घेऊन त्या चारचाकी वाहनाने अकोला पर्यंत विकण्याचा मोठा गोरखधंदा राज्य उत्पादन शुल्काच्या भरारी पथकाने उघडकीस आणला. गुप्त व खात्रीशीर माहितीनुसार, अमरावती येथील राज्य उत्पादन शुल्कच्या भरारी पथकाने नागपूर-अमरावती मार्गावरील वेलकम पॉईंटजवळ सुझुकी कंपनीची ब्रेझा क्र. एम.एच.३०,ए झेड ६०३९ ही पांढऱ्या रंगाची चारचाकी थांबवून तपासणी केली असता, वाहनातील तीन टुरिस्ट बॅगमध्ये ७५० मि.ली. क्षमतेच्या विविध



विदेशी मद्याच्या बाटल्या आढळल्या. सदर मद्य दुसऱ्या एका अज्ञात वाहनात स्थलांतर करण्याचा प्रयत्न सुरू असताना ही कारवाई करण्यात आली. हे मद्य भारतीय सैन्याच्या कॅन्टीनमधून स्वतःच्या व इतर सेवानिवृत्त सैनिकांच्या कॅन्टीन कार्डवरून खरेदी करून त्याची अवैध वाहतूक केली जात होती. या प्रकरणी अटक करण्यात आलेले आरोपी शांताराम हरी थाटे (वय ४५, रा. गीतानगर, अकोला) आणि रामेश्वर जानोजी पुंडकर (वय ५४, रा. संभाजीनगर, आकोट, जि. अकोला) हे दोघेही भारतीय सैन्य दलातून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांच्या विरोधात महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५(अ) आणि ६५(ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत विदेशी मद्य, वाहन आणि बॅग यासह एकूण ८,९७,३१६/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून खुल्या बाजारातील किंमत लक्षात घेतल्यास



मुद्देमालाची एकूण किंमत अंदाजे ९,९३,४००/- इतकी आहे. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क मुंबई येथील आयुक्त डॉ. राजेश देशमुख,सहआयुक्त प्रसाद सुर्वे,प्रभारी विभागीय उपआयुक्त, डॉ. पराग नवलकर, आणि अधीक्षक शशीकांत गर्जे यांच्या आदेश व मार्गदर्शनातप्रभारी निरीक्षक संतोष पी. वायाळ,सुभाष एस. खरे, आकाश जाधव, सादीक नौरंगाबादे, अंकुश काळे,आर. पी. मोकळकर, पी. आर. भोरे,सुजीत जाधव,विठ्ठल कस्टे, जगदीश जव्हाण, गजनन वाकोडे, के. एम. मातकर, तसेच महिला कर्मचारी श्रीमती व्ही. बी. पारखी आणि कु. डी. डी. मानकर यांच्या संयुक्त पथकाने केली.सदर गुन्ह्याचा पुढील तपास भरारी पथकाचे दुय्यम निरीक्षक संतोष पी. वायाळ हे करीत आहेत.

**'आर्मी' लिहिलेल्या वाहनातून मद्य वाहतूक**

ज्या वाहनातून मद्य वाहतूक करण्यात येत होती त्या वाहनावर 'आर्मी' असे ठळक अक्षरात लिहिलेले होते. अशा प्रकारे अवैध मद्य वाहतुकीसाठी 'आर्मी' लिहिलेल्या वाहनाचा वापर करून अधिकार्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अनेक नाकाबंदी व तपासणी दरम्यान या वाहनावर संशय येऊ नये म्हणून 'आर्मी' या शब्दाचा वापर करण्यात आला होता.मात्र राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने ही शक्कल हाणून पाडत वाहन थांबवले आणि तपासणी केली असता, त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर मद्य साठा आढळून आला.

# दापोरी येथे सुपर बस थांबत नसल्याने शेकडो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

## विभाग नियंत्रकाच्या आदेशाला मोर्शी वरूड आगाराने दाखवली केराची टोपली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मोर्शी**

मोर्शी तालुक्यात ५ हजार लोकसंख्या असलेल्या दापोरी गावाला सालबर्डी तिर्थक्षेत्रासह आसपासची ५ गावे जुळलेली आहेत. येथून शिक्षण घेण्यासाठी जाणार्या विद्यार्थ्यांची संख्याही मोठी आहे. पण शाळा, महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील जाणार्या विद्यार्थ्यांचा घोडका पाहून वरुड मोर्शी आगाराचे बस चालक अधिक वेगाने बसेस दामटवतात. परिणामी विद्यार्थ्यांना तासनतास दुसर्या बसची वाट पाहत येथे उभे राहावे लागते. आणि विद्यार्थ्यांजवळ पासेस असून सुद्धा जीव धोक्यात घालून खासजी वाहनाने प्रवास करावा लागतो त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात होत असून वाहकांच्या असभ्य वागणुकीमुळे विद्यार्थ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे वरुड मोर्शी आगाराच्या बसचालक व वाहकावर कार्यवाही करावी






अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी विभाग नियंत्रक अमरावती व परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांच्या विशेष प्रयत्नाने विभाग नियंत्रक राज्य परिवहन अमरावती यांचे पत्र क्रमांक राप/अम/विनी/वाह/चालन/२७२१ दिनांक ०७/१०/२०११ नुसार दापोरी येथे सुपर एस् टी बस थांबा मिळाला असून दापोरी येथे सुपर बस थांबत नसल्यामुळे वरूड मोर्शी आगाराच्या आगार व्यवस्थापकांनी विभाग नियंत्रकाच्या आदेशाला केराची टोपली दाखवल्यामुळे मोर्शी वरूड आगाराच्या विरोधात विद्यार्थी व नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळत आहे. वरुड - अमरावती मार्गावरील धावणार्या बस दापोरी बस थांब्यावर थांबत नसल्यामुळे दापोरी येथून दररोज शेकडो विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी मोर्शी, वरुड, अमरावती, नागपूर, काटोल, वरूड, जरुड, बेनोडा, हिवरखेड येथे जात असून नौकरदार वर्गांचीही कामावर जाण्याची मोठी गर्दी असते. त्याचप्रमाणे सालबर्डी पाळा येथे तीर्थक्षेत्र असल्याने अनेक भाविक दर्शनाला जाण्याकरिता दापोरी येथे थांबतात मात्र त्यांना तासनतास बसची वाट पाहत उभे रहावे लागत असून सुपर बसेस दापोरी बस थांब्यावर थांबत नाही. तर काही बसेस विद्यार्थ्यांचा घोळका पाहून बसेस न थांबविता आणखी वेगाने दामटवितात. त्यामुळे प्रवाश्यांना व विद्यार्थ्यांना तासनतास ताटकळत बसावे लागते.दापोरी येथे सुपर बसेसचा थांबा १४ वर्षा आधी मिळाला आहे. मात्र परिवहन विभागाचे वाहक व चालक बसेस थांबविण्यात दुर्लक्ष करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. या गंभीर प्रकाराकडे विभाग नियंत्रक यांनी लक्ष देऊन वाहक व चालकांवर कार्यवाही करून दापोरी येथे सर्व प्रकाराच्या सुपर बसेस थांबविण्याचे निर्देश देण्यात यावे अन्यथा दापोरी येथे तीव्र स्वरूपाचे चक्काजाम आंदोलन करण्यात येणार असल्याचा ईशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक व विभाग नियंत्रक अमरावती यांना दिला आहे.

**आगार प्रमुखांची बघ्याची भूमिका ?**

या गंभीर विषयाबाबत विद्यार्थ्यांनी आगारप्रमुख यांना अनेक तक्रारी करत असून त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येत नाही. मोर्शी येथून विद्यार्थी वरुड मोर्शी आगाराच्या बस मध्ये बसल्यास काही वाहक त्यांना शिवीगाळ करून अपमानास्पद वागणूक देतात, आणि विद्यार्थी बस मध्ये बसल्यास त्यांना मधेच उतरवून देण्याच्या अनेक घटना घडत असून वरूड मोर्शी आगारावर कोणाचेच नियंत्रण नसल्यामुळे विद्यार्थ्यांसोबत गंभीर प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# मेळघाटात आय ए एस अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांची नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८धारणी**

मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासा करीता आदिवासी विकास विभागाचे जिल्ह्याचे प्रकल्प कार्यालय धारणी शहरात आहे तर धारणी उपविभागीय अधिकारी कार्यालय अंतर्गत येणाऱ्या धारणी चिखलदरा या दोन तालुक्याची सीमा ही अचलपूर ,चांदुर बाजार, अंजनगाव ,अकोट ,तालुक्याच्या टोकाला जाऊन पोहचली असल्याने येथील महसूल विभागाचा सुद्धा मोठा व्याप्त भाग आहे तेथील लहान सहान समस्या मोठ्या प्रमाणात असल्याने नागरिकांना अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय गाठावे लागत होते या

महाराष्ट्र वन विभाग

सर्व बाबीचा विचार करता मंत्रालय स्तरावरून मेळघाटात आयएएस अधिकाऱ्याची नियुक्ती केल्या जाते सद्यस्थितीत तत्कालीन आयएस अधिकारी प्रियवंदा महांदळकर या दीर्घकालीन रजेवर गेल्यानंतर या दोन्ही विभागाचा प्रभार दोन वेगवेगळ्या अधिकाऱ्यांकडे होता त्या अधिकाऱ्यावर त्यांच्याच विभगाचा अतिरिक्त भार असल्यामुळे नियमित कामकाजावर मोठ्या प्रमाणात फरक पडत होता त्यामुळे शासनाने नुकत्याच झालेल्या २० आय ए एस अधिकाऱ्यांच्या बदली प्रक्रियेत सिद्धार्थ शुक्ला (आय ए एस ) अधिकारी यांचीदिनांक ०२.०७.२०२५ च्या आदेशात बदल करुन सहाय्यक जिल्हाधिकारी, गोडपिंपरी उपविभाग, चंद्रपूर यांना प्रकल्प अधिकारी आणि सहाय्यक जिल्हाधिकारी धारणी पदी नियुक्त केले असून आदिवासी विकास विभाग व महसूल विभगातील कामकाजाला नव्याने चालना मिळणार आहे.

# दर्यापूर तालुक्यात पांदण रस्त्यांचा अभाव : शेतकऱ्यांना शेतीची मशागत करताना चिखलातून काढावी लागते वाट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८दर्यापूर**

शेतकऱ्यांना शेतीची मशागत करताना आता कुठल्याही अडचणीला सामोरे जावे लागणार नाही, अशी घोषणा राज्याचे महसूल मंत्री आणि अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली होती. मात्र त्या घोषणेला आजही जमिनीवर मूर्त स्वरूप आलेले नाही, असा सवाल शेतकऱ्यांकडून विचारला जात आहे.

दर्यापूर तालुक्यातील लोतवाडा व परिसरातील अनेक गावांमध्ये अजूनही पांदण रस्ते उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी चिखल तुडवत शेतात जावे लागत आहे. याचा एक व्हिडिओ सध्या समोर आला असून, त्यात एका शेतकऱ्याला चिखलातून कसाबसा शेतात जाताना पाहायला



मिळते.शेतकरी वर्गाचे म्हणणे आहे की, सरकारी घोषणा फक्त कागदावर राहिल्या आहेत. शेतीसाठी रस्ता नसल्यानं मशागत, बियाणे पेरणी, खते वाहतूक यासाठी मोठ्या अडचणी येत आहेत.

शासनाने तातडीने लक्ष घालून पांदण रस्त्यांची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# अमरावती महानगरपालिकेची मोठी कारवाई

## अतिक्रमण हटवण्यात ६ ट्रक साहित्य जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत मध्य झोन क्र. २ राजापेठ व पूर्व झोन क्र. ३ दस्तूरनगर परिसरात मोठी अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली.

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक आणि उपायुक्त (प्रशासन) डॉ. मेघना वासनकर यांच्या आदेशानुसार ही कारवाई अतिक्रमण विभागाद्वारे करण्यात आली.

सदर कारवाई दरम्यान जुने रेल्वे स्टेशन समोरील मंगलम हॉटेलपासून खापर्डे बाग, बस स्टॅन्ड डेपो, पोलीस पेट्रोल पंप, मालटेकडी परिसरातील ज्यूस हातगाड्या, पाणीपुरवठा विभाग कार्यालय, जिल्हा परिषद कॉटर, काँग्रेस भवन समोर, रंगाळा ते राजेंद्र कॉलनी रोड तसेच रुक्मिणीनगर रोड ते सायन्सस्कोर मैदान या परिसरातील सर्व अतिक्रमण हटवण्यात आले.

यामध्ये चायनीज व ज्यूस हातगाड्या, लोखंडी पानठेले, दुकानदारांनी बाहेर टाकलेले शेड आदी साहित्याचा समावेश होता. एकूण ६ मोठे ट्रक भरून



साहित्य जप्त करण्यात आले आहे.

ही कारवाई अतिक्रमण पथक प्रमुख श्याम चावरे, योगेश कोल्हे, निरीक्षक अन्सार अहमद, श्री. शहेबान, पोलीस अधिकारी श्री. हिरुडकर तसेच अतिक्रमण कर्मचारी यांच्या सहकार्याने यशस्वीपणे पार पडली.

महानगरपालिकेच्या या कारवाईमुळे नागरिकांमध्ये शिस्तीचा संदेश गेला असून, भविष्यात अतिक्रमण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महानगरपालिकेने दिला आहे.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा ८६०५९४८८५३

# सरन्यायाधीश गवई चार दिवसापासून रुग्णालयात : गुरुवारी रात्री उशीरा रुग्णालयातून सुट्टी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८नागपूर**

न्यायमूर्ती भूषण गवई यांनी मे महिन्यात भारताचे ५२वे सरन्यायाधीश म्हणून पदाची शपथ घेतली.सरन्यायाधीश गवई यांचा सरन्यायाधीशपदाचा कार्यकाळ तुलनात्मकदृष्ट्या अल्प असून, ते २३ नोव्हेंबर २०२५ रोजी निवृत्त होणार आहेत. या सहा महिन्यांच्या कार्यकाळातला बराच काळ सर्वोच्च न्यायालयाच्या उन्हाळी अवकाशातील आहे.

अंत्यंत कमी कालावधी लाभला असला तरी सरन्यायाधीश पदाची शपथ घेतल्यावर न्या.गवई सातत्याने दौरे करत आहेत आणि वेगाने निर्णय घेत आहे. मे महिन्याच्या अंतिम आठवड्यात न्या.गवईंनी कॉलेजियमची बैठक घेत सर्वोच्च न्यायालयात तसेच देशातील विविध उच्च न्यायालयात नव्या न्यायमूर्तींची शिफारस केली.या शिफारसीला लवकर मान्यता न दिल्यामुळे न्या.गवईंनी केंद्र शासनाला खडेबोलही सुनावले होते. यानंतर त्यांनी लंडनचा दौरा केला आणि पंतप्रेधान नरेंद्र मोदी यांच्यासह संविधानाचे महत्व यावर भाष्य केले. गवई यांनी १४ मे रोजी पदभार स्वीकारल्यानंतर केवळ काही आठवड्यांतच न्यायव्यवस्थेच्या इतिहासात मोलाची आणि मूलगामी सुधारणा घडवून आणल्या आहेत.



न्यायालयीन कार्यक्षमतेपासून ते पर्यावरणसंवर्धनापर्यंत विविध मुद्द्यांवर त्यांनी झपाट्याने निर्णय घेत न्यायसंस्थेला नवे वळण दिले आहे. दरम्यान, मुंबई दौऱ्यावर असताना त्यांनी प्रोटोकॉल पालन न केल्यामुळे मुख्य सचिवांसह अधिकाऱ्यांना ख़डसावले होते. अमरावती, नागपूर, छत्रपतीसंभाजीनगर, मुंबई मध्ये आयोजित कार्यक्रमात न्या.गवई यांनी विविध सत्कार सोहळ्यात सहभाग घेतला. अलिकडेच हैदराबादमध्ये एका विधी विद्यापीठाच्या कार्यक्रमात ते सहभागी झाले होते. यात त्यांनी न्यायव्यवस्थेत बदल करण्याबाबत मत व्यक्त केले होते. या कार्यक्रमादरम्यान त्यांच्या प्रकृतीत बिघाड झाल्याची माहिती आहे.

सरन्यायाधीश भूषण गवई यांनी शपथ घेतल्यानंतर हैदराबाद, मुंबई, नागपूर, लंडन व इटली आदी ठिकाणी दौरे करून विविध मंचांवर संविधान, न्यायव्यवस्था आणि सामाजिक न्याय यावर भाष्य केले. त्यांनी हैदराबादमध्ये न्यायप्रणालीतील प्रलंबित प्रकरणांचा मुद्दा उपस्थित केला, तर मुंबई विधानमंडळात भावनिक भाषण करत तीनही राज्यघटकांमध्ये परस्पर आदराची गरज व्यक्त केली. शपथ घेतल्यापासून सातत्याने दौरे करत असल्यामुळे त्यांच्या प्रकृतीवर विपरित परिणाम झाला. हैदराबादमधून परतल्यावर त्यांना दिल्ली येथील एका खासगी रुग्णालयात सोमवारी तातडीने भर्ती करण्यात आले. त्यांना हैदराबाद दौऱ्यावर संसर्ग झाल्यावर रुग्णालयात भर्ती करण्यात आले. रुग्णालयात भर्ती केल्यावर न्या.गवईंवर डॉक्टरांनी उपचार केले.

न्या.गवईंच्या जवळच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, न्या.गवईंनीही उपचाराला प्रतिसाद दिला आणि गुरुवारी रात्री उशीरा त्यांना रुग्णालयातून सुट्टी दिली गेली. न्या.गवई आता आपल्या निवासस्थानी असून येत्या सोमवारी सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजात सहभागी होतील अशी माहिती आहे.